follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २३४ ✲ सातारा, शनिवार दि.४ मे २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/



## सातार्‍यात आज शरद पवार, फडणवीसांची तोफ धडाडणार

**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघाचा प्रचार अंतिम टप्प्यात असून महाविकास आघाडी आणि महायुतीकडूनही नेत्यांच्या सभांचा धडाका सुरू आहे. त्यामुळे ... सातार्‍यात उद्या शरद पवार, फडणवीसांची तोफ धडाडणारसातारा:सातारालोकसभा मतदारसंघाचा प्रचार अंतिम टप्प्यात असून महाविकास आघाडी आणि महायुतीकडूनही नेत्यांच्या सभांचा धडाका सुरू आहे. त्यामुळे शनिवारी सायंकाळच्या सुमारास राष्ट्रवादीचे अध्यक्षशरद पवारआणि उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांची सातारा शहरात सभा होणार आहे. या सभेतून दोघे कोणती तोफ डागणार आणि काय आवाहन करणार याकडे मतदारसंघाचे लक्ष असणार आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी एकूण १६ उमेदवार रणांगणात आहेत. ही निवडणूक प्रामुख्याने भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांच्यातच होत आहे. या निवडणुकीमुळे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या माध्यमातूनही जोरदार शक्तीप्रदर्शन सुरू आहे. तसेच प्रचारालाही गती देण्यात आलेली आहे.

तसेच आतापर्यंत दोन्हीही उमेदवारांसाठी राज्य तसेच राष्ट्रीय पातवळीवरील नेत्यांच्या सभा झाल्या आहेत. सध्या प्रचाराचा अंतिम टप्पा सुरू असून अजूनही मोठ्या सभा घेण्याचा धडाका सुरूच आहे. यामुळेच शनिवारी सातार्‍यातशरद पवारआणिदेवेंद्र फडणवीसयांची सभा होत आहे.

शनिवार, दि. ४ मे रोजी सायंकाळी पाचला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सातार्‍यातील तालीम संघ मैदानावर सभा होत आहे. महायुती उमेदवार व खासदार उदयनराजेंसाठी ही सभा असणार आहे. तर सायंकाळी सहाच्या सुमारास सातार्‍यातीलच जिल्हा परिषद मैदानावर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यासाठी सभा घेणार आहेत. दोन्हीही सभा एकाचवेळी होणार असल्याने दोघे काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## सरकारने सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील केले; आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल



**मुरुड जंजिरा :** भारतीय जनता पार्टीचे सरकार केंद्रात दहा वर्षे आहे; पण त्यांनी सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील केले असल्याचा आरोप करीत चारशे पार सोडा, त्यांना दोनशेच्या आतच जागा राहतील, असा विश्वास उद्धवसेनेचे युवानेते आदित्य ठाकरे यांनी मुरुड येथील जाहीर सभेत व्यक्त केला.

भाजपला संविधानात बदल करत आरक्षण संपुष्टात आणावयाचे आहे, असाही आरोप त्यांनी केला. यावेळी उमेदवार अनंत गीते यांनी ही लढाई भ्रष्टाचार विरुद्ध सदाचार अशी असल्याचे सांगत मतदार सुजान असल्याचे सांगितले. आमदार भाई जगताप, माजी आमदार पंडित पाटील यांनीही मार्गदर्शन केले.

सभेला आमदार संजय पोतनीस, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शेकापचे जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील, काँग्रेसचे मुरुड तालुका अध्यक्ष सुभाष महाडिक आदी उपस्थित होते.

# शुभ बोल रे नार्‍या, उद्धव ठाकरेंचा नारायण राणेंवर घणाघात

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग :** आज मी कोकणात येणार म्हटल्यानंतर कोणीतरी मला धमकी दिली. मराठीत एक म्हण आहे. त्या म्हणी मी केल्या नाहीत किंवा तुम्ही केल्या नाहीत. पण एक म्हण अशी आहे की, शुभ बोल रे नार्‍या. मी येणार म्हटल्यानंतर कसे येतात बघतो म्हणाला. मी येऊन उभा आहे. तू आडवा येच तुला गाडूनच पुढे जातो. अरे तुला लाज वाटली पाहिजे. दोन तीन वेळेस तुझ्या इकडे येऊन तुला आडवा केला. माझ्या घरात तिकडे उभारला तिकडे साफ करुन टाकला. लाज नाही लज्जा नाही. फक्त बडबडतो, अशी टीका ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपचे उमेदवार नारायण राणे (छ्रीरूप ठरपश) यांच्यावर केली. महाविकास आघाडीचे उमेदवार विनायक राऊत यांच्या प्रचारार्थ ठाकरेंची कोकणात सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलताना नारायण राणे (छ्रीरूप ठरपश) यांच्यावर कडाडून हल्लाबोल केला.




**तुमच्यामध्ये हिंमत असेल तर जनतेच्या प्रश्नावर बोला**

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, तुमच्यामध्ये हिंमत असेल तर जनतेच्या प्रश्नावर बोला. कोंबडीचोर बरोबर घेतलाय तरी अंडी काही बाहेर येत नाहीयेत, त्यावर बोला.

**शिवसेनेला नकली म्हणणारे बेअकली नाहीतर दुसरे काय असणार?**

**उद्धव ठाकरे म्हणाले, चार दिवसांपूर्वी येऊन गेलो होतो. म्हटलं आता काय बोलायचं, पण आपल्याला नकली म्हणतात त्या बेअकली जनता पक्षाचे नेते पचकून गेले. बेअकली जनता पार्टी आहे. शिवसेनेला नकली म्हणणारे बेअकली नाहीतर दुसरे काय असणार? आज पर्यंत त्यांना मी भेकड जनता पार्टी म्हणत होतो. काही लाज वाटत नाही. कमळाबाई म्हणत होतो आणि आता बेअकली म्हणतो.**

तुमच्या पेक्षा कोंबडं बरं. राम मंदिर बांधलं हे चांगलंच केलं. पण तुमची हिंमत नव्हती, तेव्हा शिवसेना पुढे होती. हिंदूहृदय सम्राट म्हणा नाहीतर तुमची जिफ सरळ करता येते. मी राम मंदिरात जाऊन आलो. तुम्ही भवानी मातेच्या मंदिरात का गेला नाहीत? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला.

## शरद पवारांसमोरच शशिकांत शिंदेंनी घेतला अजित पवारांचा आशीर्वाद

**वाई :** राज्यात निवडणुकीचा प्रचार शिगेला असताना, आरोप प्रत्यारोपांमुळे राज्यातील वातावरण गरम झालेले असताना, एकमेकांवर अक्षरशः तुटून पडणारे, पातळी सोडून एकमेकांवर टीका करणारे नेते आज पाचगणीच्या एका हाय प्रोफाईल लग्नामध्ये एकत्र आले होते. पाचगणीच्या संजीवन हायस्कूल ट्रस्टच्या भव्य मैदानावर सातार्‍याच्या राजकारणातील बडे प्रस्थ अजित पवार गटाचे वाई खंडाळा महाबळेश्वरचे आमदार मकरंद पाटील यांच्या पुतण्याच्या लग्नाचे आयोजन करण्यात होते.

वधूवरांना शुभाशीर्वाद देण्याच्या निमित्ताने पाचगणीत राज्यातील महाविकास आघाडी व महायुतीतील दिग्गज नेत्यांनी उपस्थिती लावली . निवडणुकीच्या प्रचारात महायुती आणि महाविकास आघाडीत अंतर असल्याचे जाणवत असते. आमदार मकरंद पाटील यांचे बंधू मिलिंद पाटील यांचे ज्येष्ठ चिरंजीव उत्कर्ष व नांदेड येथील सिंधी येथील व्हीपी के उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे यांची कन्या पूजा यांचा विवाह गुरुवारी सायंकाळी उशिराने पाचगणीत साजरा झाला.

या लग्नात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार खासदार श्रीनिवास पाटील महायुतीतील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



अजित पवार, पालकमंत्री शंभूराजे देसाई, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, खासदार उदयनराजे भोसले, आमदार बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, महेश शिंदे, दीपक चव्हाण, आनंदराव पाटील, सत्यजितसिंह पाटणकर यांच्यासह राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातील सर्व प्रमुख नेत्यांनी उपस्थिती लावल्याचे दिसून आले. सातारा जिल्ह्यातील सर्व आमदार प्रमुख कार्यकर्ते सनदी अधिकारी आदी उपस्थित होते. या लग्न सोहळ्यानिमित्त नेत्यांमधील अंतर गळून पडल्याचे दिसून आले.

शरद पवार समोर बसलेले असताना, त्यांच्याच पक्षाचे सातार्‍याचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी अजित पवारांना भेटून वाकून नमस्कार केला आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. आता अजितदादांचा हा आशीर्वाद त्यांना लोकसभेच्या निवडणुकीतही मिळणार का हे पाहावं लागेल. बारातमीतल्या दोन सभा रद्द करून शरद पवार उपस्थित होते. या लग्नातील गर्दीमुळे पाचगणी वाई महाबळेश्वर रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्याने अनेक नेते अधिकारी रस्त्यावर वाहनात अडकून पडले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोहोचण्यास उशीर झाला. ते रात्री साडेनऊ वाजता विवाह स्थळी पोहोचले.

एकीकडे लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे, तर दुसरीकडे पाचगणीतील आ.मकरंद पाटील यांच्या पुतण्याच्या शाही लग्न सोहळ्याला महाराष्ट्रातील दिग्गज नेते मंडळींची उपस्थिती लावली. त्यामुळे हे हायप्रोफाईल लग्न चर्चेचा विषय ठरलं. अजित पवार, उदयनराजे आणि शंभुराजे देसाई शिवेंद्रसिंहराजे शेजारी बसले होते. अजितदादांना भेटण्यासाठी अनेक लोक येत होते.

अजित पवार आणि शशिकांत शिंदे यांच्या या भेटीवर अनेकांच्या नजरा खिळल्या होत्या, अनेकांच्या फोनच्या कॅमेर्‍यांनी हा क्षण कैद केला. लग्नाच्या ठिकाणीही या भेटीची जोरदार चर्चा सुरू होती.एका बाजूला समोर शरद पवार, श्रीनिवास पाटील, रामराजे निंबाळकर शशिकांत शिंदे बसले असताना दुसर्‍या बाजूला अजित पवार, उदयनराजे आणि शंभुराजे देसाई बसले होते. रामराजे नाईक निंबाळकर व शशिकांत शिंदे यांच्यात हास्यविनोद रंगले होते. आमदार मकरंद पाटील सातारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील व बंधू मिलिंद पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले. शरद पवार लग्न समारंभ उरकून बाहेर निघाले असताना स्वागत कमानीच्या बाहेर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शरद पवार शशिकांत शिंदे यांच्या नावाने घोषणा दिल्या. समारंभ संपल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार देवेंद्र फडणवीस महाबळेश्वर येथे थांबले होते. या विवाह सोहळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली असली तरी शरद पवारांच्या साक्षीने अजित पवारांचं सर्व नेते एकमेका बरोबर हास्यविनोद रंगाची दिसून आले. यावेळी त्यांनी उशिरा खासदार उदयनराजे भोसले शिवेंद्रसिंहराजे भोसले शंभूराजे देसाई आमदार मकरंद पाटील महेश शिंदे अमित कदम यांच्याशी उदयनराजेंच्या निवडणुकीबाबत चर्चा केली.



## आरक्षणाची मर्यादा ७३ टक्के करणार, शेतकर्‍यांना कर्जमाफी देऊ

### राहुल गांधी यांची पुण्यातील सभेत घोषणा

**पुणे :** लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर आले तर देशात आरक्षणाची असलेली ५० टक्के मर्यादा हटविण्यात येईल. दलित १५ टक्के, अदिवासी ८ टक्के आणि मराठा, धनगर यांच्यासह मागास वर्गास ५० टक्के, असे एकूण ७३ टक्के आरक्षण दिले जाईल, अशी घोषणा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केली.

पुणे लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ येथे झालेल्या सभेत ते बोलत होते. नरेंद्र मोदी आणि भाजपला संविधान मिटवायचे आहे, असा गंभीर आरोपही गांधी यांनी केला. आमची लढाई ही संविधान वाचविण्याची आहे. संविधान संपविले जाईल, त्यादिवशी तुम्ही भारत देशाला ओळखू शकणार नाही. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान आम्ही कधी संपवू देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

राहुल गांधी म्हणाले, संविधान नसेल तर केवळ २५ लोकांच्या हातात देश जाईल. मोदींनी २२ लोकांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. मात्र, शेतकर्‍यांच्या कर्जमाफीचा विचार केला जात नाही. नरेंद्र मोदी ज्येष्ठ नेत्यांचा (शरद पवार) अपमान करण्यात व्यस्त आहेत. असे वागणे देशाच्या पंतप्रधान पदाला शोभत नाही.

आमचे सरकार आल्यावर जातीवर आधारित जनगणना केली जाईल. त्या-त्या जातीच्या संख्येनुसार सर्वांना संधी दिली जाणार आहे. इंडिया आघाडीचे सरकार आल्यावर देशात शेतकर्‍यांसाठी कर्जमाफी केली जाईल.

# संजय निरुपमांची घरवापसी, शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

**मुंबई :** माजी खासदार आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम यांनी तब्बल वीस वर्षांनी घरवापसी करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

काही दिवसांपूर्वी काँग्रेसने पक्षातून हकालपट्टी केलेले माजी खासदार संजय निरुपम यांनी (३ मे) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला. काँग्रेसने हकालपट्टी केल्यानंतर निरुपम शिवसेनेत जातील अशी चर्चा होती. सुरुवातीला निरुपम यांनी यावर भाष्य करणं टाळलं. मात्र गेल्या काही दिवसांमध्ये त्यांनी शिवसेनेतील नेत्यांच्या भेटी घेतल्या. पाठोपाठ त्यांनी बुधवारी (१ मे) मुंबईतील बाळासाहेब भवन येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री शिंदे आणि संजय निरुपम यांच्यामध्ये बराच वेळ चर्चा झाली. या चर्चेनंतर संजय निरुपम यांनी ते शिवसेनेच्या शिंदे गटात लवकरच प्रवेश करणार असल्याची माहिती दिली होती. निरुपम यांनी शिंदे गटात प्रवेश केला असला तर पक्ष त्यांना कोणती जबाबदारी देणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे.

काँग्रेसने निरुपम यांना लोकसभेचं तिकीट



नाकारल्यामुळे ते पक्षावर नाराज होते. तसेच त्यांनी पक्षाविरोधात वक्तव्ये केली होती. त्यामुळे पक्षाने गेल्या महिन्यात त्यांची हकालपट्टी केली होती. दरम्यान, आज त्यांनी ठाण्यातील आनंद आश्रम येथे शिंदे गटाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे.

निरुपम यांच्या पक्षप्रवेशानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, माजी खासदार आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम यांनी तब्बल वीस वर्षांनी घरवापसी करत आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. ठाण्यातील आनंद आश्रम येथे पार पडलेल्या या पक्षप्रवेशावेळी त्यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, महायुतीचे ठाणे लोकसभा मतदारसंघातील उमेदवार नरेश म्हस्के, ठाणे जिल्हा महिला संघटक मीनाक्षी शिंदे, ठाणे विधानसभा प्रमुख हेमंत पवार आणि शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिंदेंच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी निरुपम ताकद पणाला लावणार**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, २० वर्षांनी पुन्हा एकदा शिवसेनेमध्ये सक्रीय होत असल्याबद्दल संजय निरुपम यांचं आम्ही स्वागत करतो. लोकसभा निवडणुकीत स्वतःहून महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी संपूर्ण ताकद पणाला लावण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे.**

माजी खासदार आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय निरुपम यांनी तब्बल वीस वर्षांनी घरवापसी करत आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. ठाण्यातील आनंदआश्रम येथे पार पडलेल्या या पक्षप्रवेशावेळी त्यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला.


निरुपम यांच्याबरोबर मुंबई काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष जयप्रकाश सिंह, मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस अंजय श्रीवास्तव, मुंबई काँग्रेस सहकार सेलचे अध्यक्ष दिलीप राजपुरोहित, मुंबई काँग्रेस सचिव फिरोज शाह, रश्मी मेस्त्री, विधीज्ञ प्रद्युम्न वाघमारे, आनंद त्रिपाठी, मुंबई उत्तर पश्चिम जिल्हा काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष सूरज गुप्ता, बाळा तिवारी, अरुण सुवर्णा, पाचुराम जयस्वाल, सर्वेश जयस्वाल, अमित कोचरे यांच्यासह असंख्य पदाधिकारी आणि

# शस्त्रक्रियेच्या कौशल्याच्या दृष्टीने बदल

गेल्या ४० वर्षांपासून महाराष्ट्रातील अस्थिरोगतज्ज्ञांच्या सहभागाने 'महाराष्ट्र अस्थिरोग संघटना' कार्यरत आहे. १९८३ साली महाराष्ट्रातील नामवंत अस्थिरोगतज्ज्ञांनी या संघटनेची स्थापना केली. सर्व अस्थिरोगतज्ज्ञांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये परस्पर सौहार्द निर्माण करणे आणि वैद्यकीय ज्ञानाची देवाणघेवाण करत राहून, शस्त्रक्रियेच्या कौशल्याच्या दृष्टीने बदल घडवून निष्णात शल्य चिकित्सकांचा संघ उभा करणे हे त्यांचे उद्दिष्ट महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेने गेल्या ४० वर्षांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे व मार्गदर्शन शिबिरे घेतली आहेत.

अस्थिरोगत ज्ज्ञांच्या चिकित्सक गुणांमध्ये भर घालण्यासाठी हे प्रयत्न महत्त्वाचे ठरले. अस्थिरोग विषयातल्या प्रगत तंत्रज्ञानाची माहिती, उपयोगिता फक्त शहरी स्तरावर मर्यादित न राहता तालुका स्तरावर पोहोचली. त्यामुळे या उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग खेडोपाडीच्या रुग्णांनाही मिळू शकला.ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञांमधील

नैपुण्य त्यांच्यापुरतेच मर्यादित राहत होते, ते संघटनेच्या व्यासपीठावर सादर केल्यामुळे व्यापक स्तरापर्यंत पोहोचले. सर्व अस्थिरोगतज्ज्ञांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वाजवी दारात उपलब्ध करून देण्यातही संघटनेने मोलाची भूमिका पार पाडली आहे. तरुण अस्थिरोगतज्ज्ञांना अनुभवी तज्ज्ञांबरोबर कामाची संधी देऊन शल्यचिकित्सेमधील बारकावे अवगत करण्यासाठी संघटनेतर्फे फेलोशिपही दिली जाते. कायदेशीर गुंतागुंतीच्या बाबतीतही संघटना अस्थिरोगतज्ज्ञांना आवश्यक ते साहाय्य करते.महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचा स्थापना दिवस म्हणजे १ मे. या दिवशी महाराष्ट्रातील अस्थिरोगतज्ज्ञ निःशुल्क आणि निःस्वार्थ सेवा देतात. भारतीय अस्थिरोग संघटनेच्या खांद्याला खांदा लावून देशभर समाजोपयोगी कार्य करण्यात राज्य संघटनाही अग्रणी असते. यामध्ये सामान्यतः रुग्णांची मोफत तपासणी तसेच रक्त, लघवी, आदी तपासण्याही



विनामूल्य केल्या जातात. अस्थिरोग तज्ज्ञांकडून मोफत शस्त्रक्रिया शिबिरे घेतली जातात, तर काही ठिकाणी मोफत औषधे, कमरेचे, मानेचे किंवा गुडघ्याचे बेल्ट याचेही वाटप केले जाते. दरवर्षी १ ते ७ मे दरम्यान प्रत्येक अस्थिरोगतज्ज्ञ आपापल्या सोयीच्या दिवशी सेवा देतात. संधिवाताचे रुग्ण तसेच वयस्कर रुग्णांची तपासणी, खेळाडू तसेच पोलिस, सैन्यभरतीसाठी तयारी करणाऱ्या विद्याथ्यर्थ्यांची त्यांच्या अकॅडमीत जाऊन तपासणी व मार्गदर्शन, ज्येष्ठ नागरिक संघांसाठी सांध्याची झीज व हाडांच्या ठिसूळपणावर मार्गदर्शन, कॅल्शियमची तपासणी, अपंग मुलांच्या अस्थिरोग संबंधातील शस्त्रक्रिया, आदी उपक्रम निःशुल्क केले जातात.

संघटनेतर्फे ॲम्ब्युलन्सचे ड्रायव्हर्स तसेच वाहतूक शाखेतील पोलिसांना प्रथमोपचारांचे प्रशिक्षण, अपघातानंतर आवश्यक तातडीच्या सेवांबाबत मार्गदर्शन केले जाते. रस्त्यावर अपघात साधारणपणे तरुणांचे होतात, त्यात घरातली कमावती व्यक्ती दगावल्यास अवघे कुटुंब संकटात सापडते,त्यामुळे हे मार्गदर्शन लाखमोलाचे आहे.यावर्षी महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप कोठाडिया व सचिव डॉ. अभिजित वाहेगावकर यांनी या संघटनेच्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने 'सेव्ह युवर जॉइंट्स' म्हणजेच आपल्या सांध्यांची काळजी घ्या, ही संकल्पना राबविण्याचे ठरविले आहे.

मोफत सांधे तपासणी शिबिरे, वयस्कर नागरिकांना सांध्यांबद्दलच्या आरोग्याची माहिती देणे, कॅल्शियम तपासणी शिबिरे, सांधे सुदृढ राहावे यासाठी योग्य व्यायाम, जीवनसत्त्वाचे महत्त्व तसेच हाडांचा ठिसूळपणा वाढू नये यासाठी घेण्यात येणारी काळजी असे उपक्रम राबविले जात.



# मरकळमध्ये गादी कारखान्याला आग, ३ वाहने आगीत भस्मसात

## सुदैवाने जीवितहानी नाही

**(पुणे)** : मरकळ. (ता.खेड) येथील जयसिंग रामभाऊ लोखंडे यांच्या गादी कारखान्याला शुक्रवारी (दि.३) सायंकाळी पाचच्या सुमारास आग लागली. सुदैवाने आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र आगीमध्ये उत्पादनाचे साहित्य, वाहने जळून खाक झाली आहेत.

दरम्यान घटनास्थळी आळंदी नगरपरिषद, पिंपरी चिंचवड महानगर पालिका वपुणेपीएमआरडीच्या अग्निशामक दलाने धाव घेऊन रात्री उशिरा आग आटोक्यात आणली. विजेचे शॉट सर्किट होऊन आग लागल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला.-ऊत्एठढखडएचएछमरकळ येथील गादी कारखान्यास सायंकाळी पाचच्या सुमारास आग लागली. आगीची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदअग्निशमन दलाचीगाडी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन आग विझविण्याचे कार्य सुरू केले.

परंतु लागलेली आग मोठ्या प्रमाणावर असल्याने पिंपरी चिंचवड महानगर पालिका व पुणे पीएमआरडीच्या अग्निशामक दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. साधारण अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण आणण्यातअग्निशमन दलाच्याकर्मचाऱ्यांना यश मिळाले. दरम्यान आग विझवण्याचे कार्य सुरू असताना कारखान्यात असलेल्या गॅस सिलेंडरच्या टाक्या सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आल्याने स्फोट होण्यापासून अटकाव झाला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी सांगितले. आगीत गादी कारखान्याशेजारी उभ्या असलेल्या दोन ट्रक, एक पीकअप वाहन पूर्णपणे जळाले असून कारखान्याचे देखील मोठे नुकसान झाले आहे. विजेचे शॉटसर्किट होऊन आग लागल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# भोर येथील शिवसेना गट मेळाव्याचे आयोजन

## कोरेगावला प्रांत, तहसिलदारांचे दुर्लक्ष ,महिला कर्मचार्याची मनमानी

**भोर** : संपूर्ण देश अनाचाराच्या दिशेने जात असून तुमची आमची सुरक्षितता धोक्यात आली आहे. देश हुकूमशाहीच्या ताब्यात आहे. तो वाचवणे आपली सर्वांची जबाबदारी असून तुम्हीच सांगा दादा तुम्हाला परवडेल का ? जो काकाचा झाला नाही तो तुमचा काय होणार ? ज्या काकांनी त्याला राजकारणात आणुन एवढे मोठे केले अनेक वर्ष मंत्रीपदे भोगायला दिली परंतु तोच दादा उपकार विसरून विरोधात उभा आहे.असा टोला अजित पवारांचे नाव न घेता शिव सेनेचे (उ.बा.ठा.) उपनेते रवींद्र मिर्लेकर यांनी भोर येथील मंगळवार (दि.३०) रोजी संपन्न झालेल्या शिवसेना कार्यकर्ता मेळाव्यात लगावला.



बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मंगळवार (दि.३०) रोजी भोर येथे शिवसेना कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी भोर विधानसभा संपर्कप्रमुख सुनील धाकड, जिल्हा प्रमुख शंकर मांडेकर, महिला जिल्हा संघटक संगीता पवळे, तालुकाप्रमुख (पश्चिम विभाग) हनुमंत कंक, कुणाल साळुंखे, प्रसाद शिंदे, अनिल भेलके, राम गायकवाड,भरत साळुंखे,अर्जुन चव्हाण, सोपान कंक, अमोल बरदाडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे मिर्लेकर म्हणाले की तसेच मतदारांना दम देण्याचे काम चालू आहे.तुम्ही मला मते दिली नाही तर तुम्हाला विकास निधी देणार नाही असाही सज्जड दम दादाकडून मतदारांना दिला जात आहे असेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वर टीका करताना मिर्लेकर पुढे म्हणाले की, देश सुरक्षित नाही, मनिपुरमध्ये महिलांवर अत्याचार होत आहेत परंतु पंतप्रधानांना या ठिकाणी भेट देण्यास वेळ नाही. गेल्या दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी बेरोजगार तरुणांना दरवर्षी दोन करोड नोकऱ्या देणार होते म्हणजे या दहा वर्षात मोदींनी २० करोड नोकऱ्या तरुणांना देणे अपेक्षित होते परंतु असे न होता त्यांनी उद्योगधंदे विकले. यामुळे रोजगार देण्याऐवजी लाखो करोडो तरुण बेरोजगार झाले.



## पोलिस हवालदार दिपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले यांचा

# पोलीस महासंचालक पदक देऊन गौरव

**नारायणगाव :** आज महाराष्ट्र दिन एक मे निमित्त महाराष्ट्र पोलीस दलातर्फे दिले जाणारे पोलीस महासंचालक पदक या वर्षी स्थानिक गुन्हे शाखे मध्ये काम करण्याऱ्या पो.हवा. दिपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले यांना पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात देण्यात आले.

या तिघांनी गुन्हे शाखे मध्ये काम करत असताना अनेक गुन्ह्यांचा शोध लावला आहे . त्यातील महत्त्वाचे म्हणजे पिंपरखेड येथील महाराष्ट्र बँक दरोडा, जुन्नर, आंबेगाव, खेड तालुक्यातील मोठे दरोडे, अनेक खून, अनेक जबरी चोऱ्या यांसारख्या अनेक गुन्ह्याची उकल करून आरोपींना अटक केली आहे.

प्रसिद्ध गायक सिद्धू मुसेवाला खुनातील संशयित आरोपी संतोष जाधव याला गुजरात येथून,, महाराष्ट्रातून महाकाळ उर्फ सिद्धेश कांबळे याला अटक करून त्याची संपूर्ण टोळी पकडून त्यांच्याकडून एकूण १५ पिस्टल जमा केल्या होत्या. याच कार्याची दखल घेत महाराष्ट्र पोलीस दला तर्फे या तिघांना जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदक देऊन आज गौरविण्यात आले.

# श्री मुक्ताबाई व काळोबा देवाच्या यात्रेला आजपासून प्रारंभ

## ऐतिहासिक नारायणगावच्या यात्रेमध्ये सतत आठ दिवस तमाशाचे कार्यक्रम

**नारायणगाव (सा. वा.)** : नारायणगावचे ग्रामदैवत श्री मुक्ताबाई देवी व काळोबा देवाची यात्रा शनिवार दि ४ मे ते शनिवार दि ११ मे अशी ८ दिवस होणार आहे . या निमित्ताने देवीच्या पालखीची मिरवणूक घागरी मिरवणूक लोकनाट्य तमाशा, शोभेची दारूकाम, कुस्त्यांचा आखाडा, छबिना मिरवणूक, देवीस चोळी पातळ, शेरणी वाटप आदी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री मुक्ताबाई देवी व श्री काळोबा देवस्थान यात्रा कमिटीचे अध्यक्ष अशोक पाटे,विकास तोडकरी, सचिन तोडकर व अजित कोऱ्हाळे यांनी दिली.

महाराष्ट्रातील सर्वात मोठा यात्रौउत्सव अशी परंपरा असलेल्या नारायणगाव येथील यात्रेची तयारी बुधवार दि २४ एप्रिल २०२४ ला गावबैठक (कांबळा) बसवून करण्यात आली. यात्रेची वर्गणी कांबळ्यावर आणून देण्याची गेली अनेक वर्ष जुनी परंपरा आहे .यंदाच्या वर्षी शनिवार ४ मे रोजी यात्रेचा प्रारंभ होणार असून यानिमित्त सकाळी ९ ते १० या वेळेत उत्सवमूर्ती व



पादुकांची मिरवणूक, तमाशा फडमालक तुकाराम खेडकर व पांडुरंग मुळे यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक, मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळाचा कार्यक्रम, रात्री १० वाजता कै चंद्रकांत ढवळपुरीकर व किरण कुमार ढवळपुरीकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम होणार आहे, रविवार ५ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ या दरम्यान देवीचा उत्सव मांडव-डहाळे, शेरणी नैवेद्य, सायंकाळी ५ वाजता भाऊ बापू नारायणगावकर व विठाबाई भाऊ नारायणगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक, रात्री ८ वाजता देवीस चोळी पातळ, रात्री ११ वाजता अंजली राजे नाशिककर यांचा लोकनाट्य कार्यक्रम,

सोमवार दि ६ मे रोजी यात्रेचा मुख्य दिवस आहे. यानिमित्त सकाळी ७ ते १० काळोबा देवस्थान मांडव डहाळे, देवीस चोळी पातळ, शेरणी नैवद्य, सायंकाळी ५ वाजता छत्रपती शाहू महाराज व महात्मा फुले जयंतीनिमित्त मिरवणूक, सायंकाळी ८ वाजता छबिना मिरवणूक रात्री ९ वाजता शोभेचे दारूकाम, रात्री तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे यांचा लोकनाट्य कार्यक्रम.

मंगळवार ७ मे रोजी दुपारी ३ ते रात्री ७ वा कुस्त्यांचा जंगी आखाडा. रात्री ९.३० वा मालती इनामदार यांचा लोकनाट्य कार्यक्रम, बुधवार दि ८ मे रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक ,रात्री ९. ३० वाजता विठाबाई नारायणगावकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम, गुरुवार दि ९ मे ला शिवजयंती उत्सव, रात्री साडेनऊ वा मंगला बनसोडे व नितीनकुमार बनसोडे यांचा लोकनाट्य कार्यक्रम, शुक्रवार दि १० मे रोजी रात्री ९. ३० वा जगनकुमार सह हौसा वेळवंडकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम, शनिवार दि ११ मे ला यात्रेची सांगता, रात्री ९. ३० वा प्रकाश अहिरेकर व निलेश कुमार

# शेवटच्या टप्प्यात प्रचाराचा धूम धडाका

## बाणेर,बालेवाडीत महायुतीच्या प्रचाराची क्रेझ वाढतेय

**बाणेर,बालेवाडी** : पुणे लोकसभा मतदारसंघ निवडणूकीत महायुतीचे मुरलीधर मोहोळ,महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर तसेच वंचित बहुजन आघाडी कडून वसंत मोरे उभे आहे शेवटच्या घटकात प्रचाराला बाणेर,बालेवाडीत वेग आलेला दिसत आहे यात संवाद,बैठकांवर जोर प्रत्येक पक्षा कडून केला जात असला तरी महायुतीचे मुरलीधर मोहोळ यांच्या करिता भाजपाचे कार्यकर्ते जोमाने भिडल्याचे दिसत आहे

बाणेर,बालेवाडी विभागातील बडी राजकीय मंडळी हात झटकून कामाला लागल्याने मुरलीनर मोहोळ शेवटच्या टप्पातील प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसते महानगरपालीका माजी नगर सेवक अमोल बालवडकर,

भाजपा युवा नेते लहू बालवडकर, माजी नगरसेविका ज्योती कळमकर,भाजपा नेते गणेश कळमकर या विभागातिल कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन आणि घरोघरी महायुतीचे मुरलीधर मोहोळ यांना निवडून आणण्याचे आव्हाहन करत आहे या विभागात भाजपाचे तीन आणि राष्ट्रवादीचे(अजित पवार) दोन नगरसेवक







निवडून आलेले होते राजकिय उलथापालथी नंतर गटागटात विभागलेले प्रमूख राजकिय पक्ष या निवडणूकीत आपल्या सोईनुसार महायुतीत आणि महाविकास आघाड्या मध्ये एकत्रीत आल्याचे आज दिसत असले तरी पुढे कसे मतदारांना वळवतिल हे सांगणेच कठीण

मित्र पक्ष धर्म पाळून निवडणुकीच्या शेवटच्या घटकात उमेदवारासाठी सक्रीय होईल की नाही यावरून या विभागात संशयाचे वातावरण आहे हा विभाग भाजपा आणि राष्ट्रवादीचा (अजित पवार) गड हे सर्व नेते महायुतीच्या उमेदवाला निवडून आणण्या करिता जिवाचे रान

**महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना निवडून आणण्यासाठी आम्ही सर्व कटूता बाजूला ठेऊन या विभागात प्रचाराचे काम करत भाजपाचा उमेदवारास या विभागा जास्तीत जास्त बहुमत मिळवून देऊन मुरलीधर मोहोळ यांना निवडूण आणू विकास कामाकरिता आणि मोदीचे हात बळकट करण्यासाठी निवडूण आणने गरजेचे आहे**

**- लहू बालवडकर युवा भाजपा नेते बालेवाडी**

करत असल्याचे आज तरी चित्र दिसते महाविकास

आघाडीच्या उमेदवारासाठी जिवन चाकणकर आणि यांचे कार्यकर्ते सुध्दा प्रचार करतांना दिसतात यात वंचित बहुजन विकास आघाडी कडून कोणते कार्यकर्ते प्रचार कामाला लागले हे आज चित्र स्पष्ट नसले तरी आतून वसंत मोरे यांनी जोरदार फिल्डींग लावल्याचे दिसत आहे

यात भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते जोमाने प्रचार कार्यात भिडल्याचे दिसत आहे यात भाजपाचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर, भाजपा माजी नगर सेविका ज्योती कळमकर,भाजपा युवा नेते लहु बालवडकर राष्ट्रवादीचे (अजित पवार) बाबूराव चांदेरे यांना तळागाळा मधून मानणारा सर्व सामान्य गट आहे यांनी दिलेला शब्द येथिल जनता मानते महायुतीचे मुरलीधर मोहोळ हे ज्या वेळेस महापौर होते त्या काळात या विभागाकरिता विकास निधी दिला गेला अनेक कामे या विभागात मार्गी लागले या कारणाने मुरलीधर मोहोळ यांची जमेची बाजू आजतरी दिसत आहे.

**बाणेर ,बालेवाडी,पाषाण विभागाचा विकास होण्या करिता मुरलीधर मोहोळ यांनी सतत प्रयत्न केले पिण्याचे पाणी,रस्ते ,धरणातून पाणी आणण्या साठी पाईपलाईन मंजूरात त्यांच्या महापौर काळात झाली आहे अनेक विकास कामात यांनी हातभार लावला आहे पंतप्रधान मोदीचे हात बळकट करण्या साठी मुरलीधर मोहोळ यांना आम्ही या विभागात जास्तीत जास्त बहूमत देऊन यांना निवडून आणू**

**अमोल बालवडकर मनपा माजी नगरसेवक बाणेर,बालेवाडी**



# ठाकरवाडी शाळेतील नऊ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

**नारायणगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी, केंद्र वारूळवाडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे या शाळेतील इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत २० पैकी नऊ विद्यार्थी पात्र झाले आहेत. शाळा स्थापनेपासूनच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढे विद्यार्थी पात्र झाल्याने सर्व विद्यार्थी,पालक व शिक्षकांच्या मनामध्ये आनंदाचे वातावरण आहे. अतिशय कठोर मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर शाळेतील विद्यार्थी व वर्ग शिक्षिका परवीन रियाज मोमीन यांनी हे यश संपादन केले आहे.

पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे यांनी वर्गशिक्षिका परवीन मोमीन यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

कौटुंबिक स्थिती बेताची व शैक्षणिक वातावरण नसलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांनी फक्त चिकाटी व मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. या कामी शाळेतील सर्व विद्यार्थी,वर्गशिक्षिका परविन मोमीन, शाळेतील मुख्याध्यापक सुनीता गायकवाड, अशोक घोलप, केंद्रप्रमुख दिनेश मेहेर, शाळेतील सर्व शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती,विस्तार अधिकारी माधुरी शेलार,संचीता अभंग, गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे,डाएट पुणे च्या ज्येष्ठ अधिव्याख्याता राजश्री तिटकारे यांची अतिशय मोलाची साथ व मार्गदर्शन मिळाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# माढ्यात 'वंचित' फॅक्टर गणित बिघडवणार!

**सातारा :** माढा लोकसभा मतदारसंघातील प्रचार शेवटच्या टप्प्यात असून,माढा मतदारसंघात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार पक्षातच पारंपरिक लढत होत आहे. दोन्हीही पक्षांच्या उमेदवारांनी निकराने प्रचार सुरू केला आहे, तर या निवडणुकीत 'वंचित'चा उमेदवार असला तरी साताऱ्याप्रमाणे माढ्यातही मागील निवडणुकीत हा फॅक्टर तेवढा प्रभावी ठरला नव्हता, तरीही ५१ हजार मते घेतली होती. त्यामुळे यावेळी 'वंचित' कोणाचे गणित बिघडवणार का? याकडे लक्ष असणार आहे.



माढा लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. रविवारी सायंकाळपर्यंत उमेदवारांना जाहीर प्रचार करता येणार आहे. यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी अंतिम टप्प्यात प्रचाराचे रान उठवले आहे. अपक्ष उमेदवारही गावोगावी भेटी देऊन मतदारांना साद घालत आहेत. प्रमुख उमेदवारांनी राजकीय नेत्यांच्या सभांतूनही धुरळा उडवलाय. आतापर्यंत मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींच्या सभा झाल्या आहेत, पुढील दोन दिवसांतही सभांनी माढ्याचे रणांगण तापणार आहे. या निवडणुकीत ३२ उमेदवार रिंगणात आहेत. यात वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर, बहुजन समाज पार्टीचे स्वरूपकुमार जानकर हेही नशीब अजमावत आहेत

मागील २०१९ ची निवडणूक भाजप आणि राष्ट्रवादीतच झाली. त्यावेळी भाजपने मतदारसंघात प्रथमच कमळ फुलविले. त्यावेळी भाजपचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना ५ लाख ८६ हजार मते मिळाली होती, तर राष्ट्रवादीचे संजय शिंदे यांना ५ लाखांहून अधिक मते घेता आली. निवडणुकीत शिंदे यांचा ८५ हजार मतांनी पराभव झालेला, तर याच निवडणुकीत वंचितचे ड. विजयराव मोरे यांनी ५१ हजार मते घेतली होती. त्यामुळे या मताचा प्रमुख लढतीवर फारसा परिणाम झाला नसल्याचे स्पष्ट झाले; पण यावेळी वंचितचे उमेदवार बारसकर यांनी पूर्ण तयारी केली आहे, ते किती मते घेणार त्याचा प्रमुख उमेदवारांच्या जय-पराजयाच्या गणितावर काही परिणाम होणार का?,बसपाचे स्वरूपकुमार जानकर हेही किती मते मिळवणार, यावरही माढ्याचा निकाल ठरणार आहे.र

माढा लोकसभा मतदारसंघात तब्बल ३२ उमेदवार आहेत. यामध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे तीन, तर नोंदणीकृत राजकीय पक्षांचे ६ जण रिंगणात आहेत. म्हणजे विविध राजकीय पक्षांचे ९ उमेदवार माढ्यात नशीब अजमावत आहेत, तर अपक्ष २३ जणही मैदानात उतरले आहेत. या निवडणुकीतसाताराजिल्ह्यातील रहिवासी असणारे १०, तर सोलापूरमधील २२ उमेदवार आहेत. माढा मतदारसंघात अनेक राजकीय उलथापालथी झाल्याने निवडणुकीत चुरस वाढलेली आहे.

# मतदार जनजागृतीसाठी ४ मे मतदार गृहभेट दिवस म्हणून राबविण्यात येणार

## - मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन

**सातारा :** स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार यादीनिहाय १०० टक्के कुटुंबांपर्यंत पोहचून मतदार जनजागृतीचे कामकाज मतदानाच्या शेवटच्या तासापर्यंत करावयाचे नियोजित करण्यात आले असून यासाठी जिल्हयात विविध उपक्रम आयोजित करून नागरीकांमध्ये जनजागृती करणे व मतदानाची टक्केवारी वाढविणेकरिता उपक्रमांचा एक भाग म्हणून ४ मे हा दिवस मतदार गृहभेट दिवस म्हणून राबविण्यात असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिली.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालीका, नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्था व्यापक जनसंपर्क असणाऱ्या विस्तारीत प्रशासकीय यंत्रणा असल्याने यांच्याकडील सर्व अधिकारी,कर्मचारी व अधिनस्त सर्व क्षेत्रिय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दि.४ मे २०२४ रोजी त्यांच्या त्यांच्या नेमून दिलेल्या ठिकाणी किंवा मुख्यालयी किंवा त्यांचे निवासाचे परिसरात गृहभेटी देवून मतदानाविषयी जनजागृतीचे काम करणार आहेत. थेट पोहोचून त्यांना मतदानाच्या दिवशी शेवटच्या तासापर्यंत मतदानाचे कर्तव्या बजावण्यासाठी गावपातळीवर पुढीलप्रमाणे पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# गुलाल, खोबऱ्याची उधळण करत.. चोराडेत 'भैरोबाच्या नावानं चांगभलं'चा गजर

हजारो भाविक-भक्तांची गर्दी....

वडूज : चोराडे (ता. खटाव) येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जागृत देवस्थान श्री भैरवनाथाची यात्रा गुलाल खोबऱ्याची उधळण करून सासनकाठ्या नाचवून 'श्री भैरोबाच्या नावानं चांगभलं'च्या गजरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.अष्टमी दिवशी यात्रेचा मुख्य दिवस असतो, यादिवशी देवाची विधिवत पूजा करून पोशाख बांधण्यात येतो. त्याचबरोबर मंदिराच्या गाभाऱ्यास फुलांची आरास करण्यात आली होती. सकाळी देवाची आरती करून देवाची पालखी मंदिराबाहेर आल्यानंतर या सोहळ्यामध्ये परिसरातील नवसाच्या सासनकाठ्या दाखल झाल्या होत्या.

या सोहळ्यात प्रचंड गुलाल खोबऱ्याची उधळण करण्यात आली.

यामध्ये हजारो भाविकासह गावकरी व मुंबईकर मंडळी यात्रेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंदिर परिसरात मिठाई दुकाने, आकाश पाळण्यामुळे यात्रा परिसर गजबजलेला होता. श्री भैरवनाथ पालखी मिरवणुकीत पुजारी व देवाचे मानकरी सहभागी झाले होते. मिरवणुकीत लेझीम, गजी, सनई, बँड, घोडा, देवाचा मानदंड होता.तर युवकवर्ग सासनकाठ्या नाचवण्यात दंग झाले होते. भैरवनाथाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात गुलालाची उधळण करण्यात आल्याने अवघा आसमंत गुलालमय झाला होता.तर सासनकाठ्या



ग्राम प्रदक्षिणेसाठी रवाना झाल्या. भाविकांनी गुलाल, खोबऱ्याची उधळण आणि भैरवनाथाचा गजर केला. भाविकांनी पालखीवर नारळ व नोटांची तोरणे अर्पण केली. यात्रेत तमाशा, कुस्त्या, ऑर्केस्ट्रा आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

सकाळपासून चोराडेसह रहाटणी, वांझोळी, शेनवडी, म्हासुर्णे, वडगाव, उंचीठाणे, या पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविकांनी श्री भैरवनाथाच्या दर्शनासाठी भाविक- भक्तांनी मोठी गर्दी केली होती.

# गावाच्या विकास कामात तत्पर सहकार्य करणारं नेतृत्व म्हणजे आमदार जयाभाऊ!

## प्रचंड बहुमताने रणजितसिंह नाईक निंबाळकरांना विजयी करणार!

## गुरसाळे भाजप संघटना व ग्रामस्थांचा एकमुखी निर्धार!

**वडूज :** आमदार जयकुमार गोरेंच्या माध्यमातून गुरसाळे गावात अनेक विकास कामं झाली आहेत. ऐन दुष्काळी परिस्थितीत ही गावाला व शेतीला मुबलक पाणी मिळालं आहे.विविध ठिकाणी रस्ते, अंतर्गत रस्ते, शेतकरी, विद्यार्थी यांना वैयक्तिक लाभ मिळाले आहेत. गुरसाळे गावातील भाजप संघटना व ग्रामस्थांनी,भाजप जिल्हा उपाध्यक्ष भरतशेठ जाधव, युवा नेते डॉ. बाळासाहेब झेंडे,निलेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार जयकुमार गोरेंना अनेक दिवसांपासून खंबीर साथ दिली आहे.

गावासाठी कोणतं ही विकास काम मागितलं तर एका क्षणात मागणी पूर्ण करणारं दमदार नेतृत्व हे फक्त जयकुमार गोरे हेच असून त्यांच्या नेतृत्वाखाली यापुढेही काम करणार असून माढा लोकसभा मतदार संघांचे भाजप महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना कोणत्याही परिस्थितीत गावातून लीड देणार असल्याचा निर्धार भाजप संघटना व ग्रामस्थांनी गुरसाळे येथील बैठकीत व्यक्त केला.दोन दिवसांपूर्वी घडलेल्या रामकृष्ण हरी वाजवा तुतारी या घटनेचा यावेळी निषेध करण्यात आला.

यावेळी भरतशेठ जाधव, डॉ. बाळासाहेब झेंडे, मांडके सर, रॉयल कारभार ग्रुपचे सौरभ जाधव, वसंत जाधव, संतोष जाधव, भागवत जाधव, आदींनी मनोगतं व्यक्त केली.

बैठकीस अरुण देवरे, रघुनाथ काबुगडे, आदींसह पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# अबकी बार भाजपा हद्दपार : खा. डॉ. अमोल कोल्हे

**म्हसवड :** देशातील भाजप सरकार हे खोटारडे अन् दहशतवाद पसरवणारे असुन देशातील तरुण अन् शेतकरीवर्गाला देशोधडीला लावणार्या या सरकार चा शेर भरला असुन आता सामान्य जनतेला बदल हवा आहे त्यामुळेच आता देशभर अबकी बार भाजपा हद्दपार चा नारा इंडिया आघाडीकडुन दिला जात आहे, बदलाच्या या लढाईत माढा मतदार संघातील जनतेनेही सरभागी होत अबकी बार भाजपा हद्दपार च्या मोहीमेत आपले योगदान द्यावे असे आवाहन महाविकास आघाडीचे स्टार प्रचारक खा.डॉ. अमोल कोल्हे यांनी केले.

महाविकास आघाडीचे माढ्याचे उमेदवार धैर्यशिल मोहिते- पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित म्हसवड येथील जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते - पाटील, धनगर समाजाचे नेते उत्तमराव जानकर, माण - खटाव राष्ट्रवादीचे नेते प्रभाकर देशमुख, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख संजय भोसले, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या प्रा. कविता म्हेत्रे, अर्जुनसिंह मोहिते - पाटील, राष्ट्रीय कॉंग्रेसचे रणजीत देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, युवा नेते अभयसिंह जगताप, माजी नगराध्यक्ष विलासराव माने, बाळासाहेब



सावंत, बाबासाहेब माने, किशोर सोनवणे, जयसिंह राजेमाने, दिपसिंह राजेमाने, पृथ्वीराज राजेमाने, चंद्रकांत केवटे, सचिन लोखंडे यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना खा. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की विजयदादांदाच याठिकाणी असणे हीच विजयाची नांदी आहे, झुंड मे आनेवाले कुत्तों से कह दो टायगर अभि जिंदा है, असे म्हणत त्यांनी विजयसिंह मोहिते- पाटील यांना टायगर अशी उपमा दिल्याने उपस्थितांनी टाळ्या देत त्यांचे जोरदार समर्थन केले. पुढे डॉ. कोल्हे म्हणाले की लढणार्यांच्या यादीत महाराष्ट्र सर्वात अग्रेसर राहिला आहे, आज ही तो सर्वात पुढे ठेवण्याचे काम तुम्हा - आम्हाला करावयाचे आहे, आता माढ्यात फक्त निवडणुकीची औपचारीकता राहिली आहे, सर्वसामान्य जनतेची फसवणुक करणारे हे सरकार हद्दपार करा असे आवाहन करीत डॉ. कोल्हे पुढे म्हणाले की मी कार्यक्रमाच्या निमीत्ताने देशभर फिरत असतो त्यावेळी अनेक राज्यात माणचे तरुण पोटासाठी काम करीत असताना आपण पाहिले आहेत त्यांना विचारल्यावर सांगतात की आमच्या माणमध्ये कोणतेही काम नाही, कारखानदारी नाही, शेतीला पाणी नाही, आमच्या पिकांना भाव नाही मग आम्ही जगायचे कसे केवळ चिमुटभर पोटाची भुक भागवण्यासाठी येथील तरुण जर देशभर फिरत असतील तर मग ही परिस्थिती याठिकाणी कोणी आणली, येथील लोकप्रतिनिधी काय करीत आहेत. प्रत्येक समाजाची जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी असताना याला भाजप विरोध करीत आहे, ते का विरोध करीत आहेत याची माहिती आता सर्वांनी घ्यावी याबाबतचा जाब आता जनतेने त्यांना विचारणेची वेळ आली आहे.पवार साहेब हे महाराष्ट्र चा आत्माच आहेत ते शेतकरी वर्गाचे खरे कैवारी आहेत त्यांच्यावर पंतप्रधानांनी टिका करताना पुर्वी आपण त्यांच्याबद्दल काय बोललो होतो ते विसरले, हेच पंतप्रधान यापुर्वी पवार साहेबांना आपले राजकिय गुरु म्हणाले होते, पवार साहेब हे महाराष्ट्राची अस्मिता आहेत हेच आता दाखवुन देण्याची वेळ आली आहे त्यासाठी आता केंद्रातील सत्ता उलथुन टाका अन् तुमच्या प्रश्नाची सोडवणुक करण्यासाठी धैर्यशिल मोहिते - पाटील यांना संसदेत पाठवा असे आवाहन शेवटी डॉ. कोल्हे यांनी करीत अब की बार भाजपा हद्दपार असे म्हणत देशात यंदा बदल निश्चित होणार आहे या बदलात सहभागी होण्यासाठी सर्वांनी फक्त महाविकास आघाडीला निवडुन द्या असे ही शेवटी सांगितले.

## पाल येथे दोन लाखांच्या कलिंगडची चोरी

**उंब्रज :** पाल ता. कराड येथील शेतकऱ्याने लागवड केलेल्या तोडीस आलेल्या २ लाख रुपये किंमतीच्या २० टन कलिंगड पिकाची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. दाखल फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर उंब्रज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रविंद्र रामराव पाटील रा. पाल ता. कराड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून,पाल ता. कराड येथील शेतामध्ये दोन एकर कलिंगडची लागवड केलेली आहे. दि. २६ रोजी सकाळच्या सुमारास फिर्यादी शेतात गेले असता शेतात वर्दळ झाल्याचे दिसून आले.यावेळी शेतात फिरून पाहिले असता शेतातील तयार झालेले मोठे कलिंगड फळ अज्ञाताने तोडुन चोरून नेल्याचे निदर्शनास आले. तसेच या आधीही अज्ञाताने कलिंगड फळ तोडुन चोरून नेत असल्याचे फिर्यादी पाटील यांचे लक्षात आले. यावरून दोन एकर शेतीत लागवड केलेले तयार झालेले २ लाख रुपये किंमतीचे २० टन कलिंगड फळ चोरून नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## पंतप्रधान हे मानवतेचे कार्यालय असावे : ऍड.प्रकाश आंबेडकर

**सातारा :** हुकूमशाहीला मूठमाती देण्यासाठी व वसुलीचे सरकार घालविण्यासाठी वंचितला साथ द्यावी.जिव्हाळा प्राप्त करण्यासाठी पंतप्रधान कार्यालय हे मानवतेचे कार्यालय निर्माण झाले पाहिजे. असे प्रतिपादन ऍड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केले.

सातारा लोकसभा वंचितचे अधिकृत उमेदवार प्रशांत कदम (सैनिक) यांच्या प्रचारार्थ कराड येथे झालेल्या सभेत वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ऍड. आंबेडकर मार्गदर्शन करीत होते.ते पुढे म्हणाले, द्वेषाचे राजकारण बीजेपी करीत आहे. वंचितने ओबीसी- मराठा यांच्यामध्ये मध्यस्थाची भूमिका प्रभावीपणे केली आहे. मुसलमान, जैन आदिना विरोधक उमेदवारी देत नाहीत.सध्याचे सरकार कर्जबाजारी झाले आहे. हाच शिलशीला राहिला तर सन २०२६ ला सुमारे ९६ टक्के कर्ज होणार आहे.बीजेपी चोरांना अभय देण्यासाठी वाशिंग मशीनचा वापर करीत आहे. गुजरातचे पंतप्रधान म्हणुन नरेंद्र मोदी काम करीत आहेत. कांद्याच्या निर्यातीबाबत पहिल्यांदा गुजरातसाठी निर्णय घेतला होता.दिल्लीत आंतराष्ट्रीय कार्यक्रम घेण्याऐवजी गुजरातला १० वर्षात अनेक कार्यक्रम घेतलेले आहेत.मुंबई - गुजरात साडेचार तासाचा प्रवास असताना कोट्यावधी खर्च करून ५० मिनिटांत पोहचण्यासाठी बुलेट ट्रेन चालु केली आहे. एका माणसाच्या इगोसाठी गुजरातसाठी कर्ज काढले जात आहे. महाराष्ट्र राज्य सक्षम असून इतर राज्यांची परिस्थिती उलटी आहे.तेव्हा दिल्ली ऐवजी अहमदाबाद कॅपिटल (राजधानी) म्हणुन मोदींनी एखदाचे जाहीर करावे. इथेनॉलसारख्या प्रकल्पासाठी पाठींबा देत विकास करूया.तेव्हा शांततापूर्वक बदल करण्यासाठी सर्वांनी सज्ज राहिले पाहिजे.

यावेळी जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण देसाई,उमेदवार प्रशांत कदम, निरीक्षक प्रा.सोमनाथ साळुंखे, प्रवक्ते इम्तियाज नदाफ, माजी सैनिक निंबाळकर, क्रांतीताई सावन्त आदींनी तडाखेबाज व अभ्यासपूर्ण भाषणे केली.

# अपघाताला निमंत्रण देणारे ते झाड हटवा



म्हसवड : म्हसवड पुळकोटी रस्त्यालगत असलेलल्या झाडांपैकी एक झाड हे एका बाजुने पुर्णपणे झुकल्याने त्याचा अर्धा भाग हा रस्त्याच्या मध्यावर आला आहे, यामुळे समोरुन येणारे वाहन हे चालकाला दिसत नाही यामुळे याठिकाणी अपघात होण्याची सर्वाधिक शक्यता ही वाहन चालकांकडुन वर्तवली जात असल्याने एखादा गंभीर अपघात याठिकाणी होण्यापुर्वीच अपघाताला निमंत्रण देणारे ते झाड काढावे अथवा ते सरळ तरी करावे अशा मागणी वाहनचालकांतुन होत आहे.

म्हसवड ते पुळकोटी या मार्गावर दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली असली तरी सध्या या मार्गावरील एक झाड हे पुर्णपणे रस्त्यावरच झुकल्याने अनेक वाहन चालकांच्या काळजाचा ठोका वाढला आहे, या मार्गावरुन प्रवास करताना अचानक एक झाड रस्त्यावर झुकल्याचे दिसताच अनेकदा वाहन चालकांना अचानक याठिकाणी एकदम ब्रेक लावावा लागत आहे, अचानक ब्रेक लागल्याने अनेक वाहने गतीमुळे घसरत आहेत तर दुचाकी चालवणार्या वाहनाना हे झाड दुरवरुन दिसतही नाही त्यामुळे अनेकदा दुचाकीस्वारांचा अंदाज चुकत आहे. चारचाकी वाहन चालकांना याठिकाणी रात्रीच्यावेळी अंदाज येत नाही या परिसरात समोरासमोर दोन वाहने आल्यावर दोन्ही वाहन चालकांमध्ये वाद निर्माण होत आहेत. जाणीवपुर्वक एक वाहन दुसर्या वाहनावर जात असल्याची भावना संबधीत चालकांच्या मनात येत असल्याने याठिकाणी वाद होत आहेत. वास्तविक हे वाद केवळ रस्त्यावर अचानकपणे झुकलेल्या त्या झाडामुळे होत आहेत, सदरचे झाड हे या मार्गावर असलेल्या सरकार ढाब्याच्या नजीक असुन याठिकाणी नेहमीच वाहनांची ये - जा सुरु आहे, मात्र सदरच्या झाडामुळे या ठिकाणी अपघातक्षेत्र निर्माण झाले असुन वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने हे झाड अपघाताला निमंत्रण देणारे ठरत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापुर्वीच संबधित विभागाने याकडे लक्ष देवुन रस्त्यातील हा अडथळा दुर करावा अशी जोरदार मागणी वाहन चालकांतुन होत आहे.

# रंगांच्या अनेक उधळणीतून व्यक्त झाला गुलमोहर

## सदर बाजारच्या सेंट थॉमस चर्चमध्ये रंगला चित्र मेळा

**सातारा :** रौप्य महोत्सवी वर्ष पूर्ण करणारा साताऱ्याचा गुलमोहर महोत्सव येथील सेंट थॉमस चर्चमध्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून साजरा झाला. दरवर्षी कालिदास पेट्रोल पंपाच्या परिसरात भरणारा हा महोत्सव यंदा सदर बाजार येथील सेंट थॉमस चर्चमध्ये रंगला. कॅलिग्राफी, शिल्पाकृती, वेगवेगळ्या रंगांच्या चित्रकृती, कवी संमेलन अशा विविध कार्यक्रमांना सातारकरांनी आणि येथील रंगकर्मी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला येथील चित्रकला कार्यक्रमांमध्ये सातारा जिल्ह्यासह वेगवेगळ्या शहरातील ५०० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

साताऱ्यात १ मे हा गुलमोहर डे म्हणून साजरा करणारे सातारा हे जगातील एकमेव शहर आहे. १९९९ सालापासून साताऱ्यात हा दिवस साजरा केला जात आहे. बुधवारी १ मे रोजी सकाळी १० वाजल्यापासून सदर बाजारातील सेंट थॉमस चर्चमध्ये गुलमोहोर डे साजरा होत असताना सुमारे ५०० रंगकर्मींनी प्रतिसाद दिला. कॅनव्हासवर वेगवेगळ्या गुलमोहराची अनेक वेगवेगळ्या



रंगातील चित्रे अत्यंत आकर्षक पद्धतीने प्रकट झाली. गुलमोहर परिवाराचे सदस्य सागर गायकवाड कबीर गायकवाड पीव्ही तारू इत्यादी संयोजकांनी या महोत्सवाचे नेटके संयोजन केले होते.

बेंगलोरच्या वसुंधरा शालगर, मुंबईचे नंदू टार्टर, वडूजचे दिनेश माने, कॅलिग्राफी आर्टिस्ट ओंकार पाटील, इंटरनॅशनल चित्रकार अमित ढाणे इत्यादी रंगकर्मींनी वेगवेगळ्या प्रयोगातून गुलमोहर महोत्सवाला चार चांद लावले. यंदा सातारा पंढरपूर रस्त्याच्या रुंदीकरणामुळे अनेक गुलमोहराच्या झाडांची कत्तल झाली. त्यामुळे यंदा प्रथमच गुलमोहर महोत्सवाचे ठिकाण बदलण्यात आले होते. सेंट थॉमस चर्चा प्रांगणातल्या गुलमोहरांच्या अनेक झाडांखाली हा महोत्सव अत्यंत आकर्षक पद्धतीने रंगला कॅलिग्राफी ओंकार पाटील आणि शिल्पज्ञ नंदू स्टार्टर यांच्या वेगवेगळ्या कलाकृतींना सातारकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला सायंकाळी पर्यावरण निसर्ग तसेच प्रेम कविता व्यक्त करणारे काव्य संमेलन उस्फूर्तपणे रंगले. सुमारे २५ हून अधिक कवींनी या महोत्सवात भाग घेतला होता.

# शिरोळ मतदारसंघात विकासाची गंगा आणणाऱ्या खासदार धैर्यशील माने यांना विजयी करावे

## डॉ अरविंद माने शेडशाळ येथील प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरोळ :** सबका साथ सबका विकास ही विचारधारा घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गेली दहा वर्षे देशाच्या प्रगतीसाठी झटत आहेत शेतकरी कष्टकरी आणि सर्वसामान्य जनता केंद्रबिंदू मानून त्यांच्या हिताची धोरण राबवत त्यांचे जीवनमान उंचाविण्याचे काम त्यांनी केले आहे त्यांच्या नेतृत्वाखाली खासदार धैर्यशील माने यांनी मतदार संघात विकासाची गंगा आणली यामुळे हजारो कोटी रुपयांची विकास कामे झाली आहेत देशाला सक्षम नेतृत्व हवे असल्याने नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष आणि शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद माने शेडशाळ येथे केले

महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ शेडशाळ (ता शिरोळ) येथे प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी नगरसेवक डॉ अरविंद माने हे बोलत होते ते पुढे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली खासदार धैर्यशील माने यांनी सुमारे आठ हजार दोनशे कोटी रुपयांची विकास कामे हातकलंगले लोकसभा मतदारसंघात केली आहे आपल्या मतदारसंघात विकासाभिमुख नेतृत्वाची गरज असल्यामुळे पुन्हा एकदा खासदार धैर्यशील माने यांना खासदार करण्याची गरज आहे त्यामुळे महायुतीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन महायुतीचा जाहीरनामा व धनुष्यबाण प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवून खासदार धैर्यशील माने यांना विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले

या प्रचार फेरीला जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला भारतीय जनता पार्टी जैन प्रकोटचे सहसचिव व जिल्हा चिटणीस महावीर तकडे भाजपा ओबीसी सेल शिरोळ तालुकाध्यक्ष सदाशिव आंबी माने गटाचे गौस पाथरवट कलाप्पा कांबळे अशोक सूर्यवंशी अविनाश तकडे अवी शहापुरे अवि कोल्हापूरे सुरेश नायकवडे साहेब पाथरवट विजय कोळी भरत लाड दादा कडोळी शिवाजी सूर्यवंशी रोहन साजणे अमर नाईक चेतन नाईक यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने या प्रचार फेरीत सहभागी झाले होते

# उरण तालुक्यातील मोठ्या यात्रांमध्ये बारणे यांची हजेरी

## खासदार बारणे यांनी घेतले रत्नेश्वरी देवी व शांतेश्वरी देवी यांचे आशीर्वाद



**उरण -** मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी-मनसे-आरपीआय-रासप-मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी गुरुवारी रात्री उरण तालुक्यातील श्रद्धास्थान असलेल्या श्री रत्नेश्वरी देवी व श्री शांतेश्वरी देवी यांचे यात्रेनिमित्त मंदिरात जाऊन पूजा केली व आशीर्वाद घेतले. त्यानंतर त्यांनी जसखार व नवीन शेवा या गावांमधील मान्यवरांच्या निवासस्थानी जाऊन गाठीभेटी घेतल्या.

उरण तालुक्यातील जसखार येथील श्री रत्नेश्वरी देवी यात्रा व पालखी सोहळ्यात खासदार बारणे दरवर्षी सहभागी होतात. या वर्षीही ते आवर्जून जसखारच्या मंदिरात जाऊन रत्नेश्वरी मातेचे दर्शन घेतले. त्यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मेघाताई दमडे व अन्य पदाधिकारी होते. नितीन पाटील, दीपक ठाकूर, अमित ठाकूर, गणेश घरत, उपसरपंच प्रणाली म्हात्रे आदी पदाधिकाऱ्यांनी खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. भाजपचे ज्येष्ठ नेते पी. जे. पाटील तसेच मधुकर पाटील व संदीप भोईर यांच्या निवासस्थानी बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. फटाके वाजवून व औक्षण करून बारणे यांचे स्वागत करण्यात आले.

नवीन शेवा येथील श्री शांतेश्वरी देवीच्या मंदिरात जाऊन खासदार बारणे यांनी दर्शन घेतले. नवीन शेवा ग्राम सुधारणा मंडळाच्या वतीने अध्यक्ष कमलाकर पाटील तसेच चंद्रकांत घरत, पंडित घरत, हिराजी घरत, एस. जी. म्हात्रे, भारत भोईर, हेमंत म्हात्रे, भगवान घरत, रमेश म्हात्रे, आदिनाथ भोईर, भावेश भोईर, मालती म्हात्रे, राकेश भोईर आदींनी बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. गावातील काही मान्यवरांची त्यांनी घरी जाऊन भेट घेतली. निवडणुकीत सहकार्य करण्याची विनंती बारणे यांनी केली.

# एकाच कुटुंबातील पाचजण श्री क्षेत्र नृसिंहवाडी नदीपात्रात बुडाले

## पुरुषांपेक्षा महिलांच्या मतदानाचे प्रमाण कमीच

**कुरुंदवाड :** अहमदनगर येथून श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे दत्त दर्शनासाठी आलेले पानेरी कुटुंब आंघोळीसाठी नदीपात्रात गेले असता पाय घसरून तोल गेल्याने पाच जण अचानक बुडू लागले, यावेळी नदीपत्रात ग्रस्त घालणाऱ्या वजीर रेस्क्यू फोर्सच्या जवानांनी आपला जीव धोक्यात घालून या पाच जणांना वाचवून जीवदान दिले. ही घटना आज शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, अहमदनगर येथून पानेरी कुटुंब दत्त दर्शनासाठी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे आले होते. दत्त दर्शना अगोदर नदीपात्रात स्नान करण्यासाठी ते कुटुंब गेले, यावेळी नदीपात्रात असलेल्या पायऱ्यावर शेवाळ असल्याने कुटुंबातील सदस्यांचा पाय घसरला एकमेकांना बाहेर काढण्यासाठी कुटुंबातील पाच व्यक्ती नदीपत्रात पडल्याने ते सर्वजण बुडू लागले. दरम्यान या ठिकाणी वजीर रेस्क्यू फोर्स चे जवान गस्त घालत होते. ही घटना त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने आपला जीव धोक्यात घालून नदीपात्रात उडी मारली व पानेरी कुटुंबातील सर्व सदस्यांचा जीव वाचवला. गेल्या पंधरा दिवसात श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे बुडणाऱ्यांची संख्या वाढत असून दत्त देवस्थानच्या वतीने भाविकांच्या सुरक्षेसाठी विविध उपयोजना करण्याची मागणी जोर आता जोर धरत आहे.



# महायुतीला पाठिंबा दिलेल्या अभिजित पाटलांच्या साखर कारखान्यावर कारवाई टळली

माढा लोकसभा मतदारसंघात श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी महायुतीला पाठिंबा जाहीर केल्याने मोठा ट्विस्ट तयार झालाय. शरद पवार यांचे निकटवर्तीय मानले जाणारे अभिजीत पाटील यांनी काही दिवसांपूर्वीचदेवेंद्र फडणवीसयांची भेट घेतली होती. त्यानंतर अभिजीत पाटील यांनी धैर्यशील मोहिते पाटील यांचा पाठिंबा काढून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना मदत करण्याचे जाहीर केलं होतं. त्यानंतर आता अभिजीत पाटील यांच्याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अभिजीत पाटील यांच्या साखर कारखान्याला जप्तीच्या कारवाईतून मोठा दिलासा मिळाला आहे. ४४२ कोटी थकवल्याप्रकरणी कारखान्याचे गोदाम सील करण्यात आले होते. मात्र आता कारवाईतून दिलासा मिळताच गोदामाचे सील काढले जाणार आहे.



पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर शिखर बँकेने कारवाई केली. कारखान्याची तीन गोदामे बँकेने सील केली होती. राज्य शिखर बँकेकडून विठ्ठल सहकारी कारखान्याने कर्ज घेतले होते. मात्र कर्जाची परतफेड न केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी अभिजीत पाटील हे शरद पवार गटात होते. त्यामुळे ते सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात सक्रिय होते.

कारखान्यावरील बँकेने जप्तीची कारवाई केल्यानंतर पाटील यांनीदेवेंद्र फडणवीसयांची भेट घेत महायुतीच्या उमेदवारांना आपला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर आता कारखान्यावरील मोठी कारवाई टळली आहे.

अभिजीत पाटील यांच्या साखर कारखान्याची तीन गोदामे थकबाकीमुळे सील केली होती. त्यामध्ये सुमारे १४ हजार क्किंटल साखर गोदामात अडकून पडली होती. मात्र या कारवाईतून मोठा दिलासा मिळाल्यामुळे तिन्ही गोदामांचे सील काढण्यात येणार आहे. ही कारवाई बेकायदा आणि लहरीपणाची असल्याची टिप्पणी करत कारखान्याची गोदामे सीलमुक्त करून पाच मेपर्यंत त्यांचा ताबा पुन्हा कारखान्याकडे देण्याचे आदेश पुण्याच्या कर्ज वसुली लवादाने दिले. कारखान्याच्या जुन्या संचालक मंडळाने कर्ज थकवले होते. २०२१ पासून कारवाई सुरु होती.

शासनाने आम्हाला मदत केल्यामुळे बँकेने कोर्टात सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे न्यायालयाने गोडाऊनला लावलेले कुलूप उघडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राजकीय वर्तुळातील चर्चेचा हा विषय नाही. २०२१ पासून ही कारवाई सुरु होती. सरकारला विनंती केल्यानंतर त्यांनी मला दिलासा दिला. साखर कारखाना सुरु राहिला पाहिजे हा महत्त्वाचा विषय होता.

टीका टिप्पण्या होत राहतील पण सहकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर कारखाना महत्त्वाचा आहे हे ठरवण्यात आलं, असं अभिजीत पाटील यांनी म्हटलं आहे.कारखाना वाचत असेल तर मी कुठेही जायला तयार - अभिजीत पाटीलकारखान्याचं सील काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे मी देवेंद्र फडणवीस यांना सांगितले.

# वाघ समोरून हल्ला करतो, झुडपात बसून कारस्थान करत नाही

## राऊतांचा विश्वजित कदमांना टोला

**सांगली :** वाघ हा समोरून हल्ला करतो, झुडपात बसून कारस्थान करत नाही. सांगलीतला वाघ कोण हे ४ जूनला निकालानंतर कळेल असा टोला उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी काँग्रेस नेते विश्वजित कदम यांना लगावत प्रतिउत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे वाघ असले तरी आम्ही सांगलीतील वाघ आहोत असं विधान कदम यांनी केले होते. त्यावर राऊतांनी हे भाष्य केले.

संजय राऊत म्हणाले की, सांगलीत वसंतदादा पाटील हा वाघ आम्ही पाहिलेला आहे. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, उद्धव ठाकरे हे आम्ही पाहिलेत, वाघाची रचना आणि वाघाचा स्वभाव वेगळा असतो. विश्वजित कदम नक्कीच वाघ असतील पण ते वाघ आहेत की नाही हे ४ जूनला कळेल. जर त्यांनी मोठ्या ताकदीने चंद्रहार पाटलांना विजयी केले तर ते नक्कीच वाघ आहेत अशी पदवी आम्ही त्यांना देऊ.

मविआच्या इथल्या प्रमुख नेत्यांना स्वतःला वाघ असल्याचं सिद्ध करायचं असेल तर त्यांनी चंद्रहार पाटलांना विजयी केले पाहिजे मग आम्ही ४ जूनला येऊन या वाघांचा सत्कार करू असं त्यांनी सांगितले.

विश्वजीत यांना वाघ आहोत हे सिद्ध करावे लागेल. शिवसेना अधिकृतपणे वाघ आहे. आमचे बोधचिन्ह वाघ हे बाळासाहेब ठाकरेंनी साकारलं आहे. वाघ हा समोरून हल्ला करतो. वाघ उत्तम शिकारी असून तो समोरून हल्ला करतो. झुडपात बसून वाघ कारस्थाने करत नाही. त्यामुळे सांगलीत कोण किती वाघ हे कळेल, सांगलीतील जनता वाघासारखी आहे. ती कुठलीही कारस्थाने, डावपेच सहन न करता पैलवान चंद्रहार पाटील यांच्या मागे उभी राहील असंही संजय राऊतांनी म्हटलं.

दरम्यान, चंद्रहार पाटील कुठेही कमी पडत नाही. त्यांचे साखर कारखाने नाहीत, त्यांनी शेतकऱ्यांचे पैसे बुडवले नाहीत. संस्था बुडवल्या नाहीत. हा त्यांचा कमकुवतपणा नाही. ही त्यांची ताकद आहे. ते प्रामाणिक आहेत. असे अनेक उमेदवार मित्रपक्षाने उभे केलेत, ते कमकुवत असले तरी आम्ही त्यांचा प्रचार करतोय. हे आम्ही सांगत नाही. आम्हाला माहितीये आम्ही वाघ आहोत. आम्ही त्यांना विजयी करू हे खात्रीने सांगतो असं सांगत संजय राऊतांनी मित्रपक्षांनाही चिमटा काढला.

### शरद पवार यांच्या ताफ्यातील दोन वाहनांचा अपघात; कार्यकर्ते सुखरूप

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाहनांचा ताफा शुक्रवारी चोपड्याकडून भुसावळकडे जात असताना, यावल तालुक्यातील किनगावनजीक या ताफ्यात पुढे असलेल्या वाहनाने गतिरोधकानजीक अचानक ब्रेक लावला. यामुळे ताफ्यातील दोन वाहने एकमेकांवर धडकली. यात वाहनाचे नुकसान झाले असून, कार्यकर्ते सुखरूप आहेत. रावेर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी दुपारी शरद पवार यांच्या चोपडा, मुक्ताईनगर, भुसावळमध्ये जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी चोपडा येथील जाहीर सभा झाल्यानंतर शरद पवार हे भुसावळकडे रवाना झाले. त्यांच्या वाहनाच्या ताफ्यातील पुढील मोटारचालकाने किनगावनजीक असलेल्या गतिरोधकाजवळ अचानक ब्रेक लावला. त्यामुळे ताफ्यातील दोन वाहने एकमेकांवर धडकली. दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून, अपघातात कोणालाही दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले.



# केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर

## चोपडा येथील सभेत शरद पवार यांची टीका

**जळगाव :** गेल्या दहा वर्षात इंधनाचे भाव कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. शेती मालाला भाव नाही, शेतकरी आत्महत्या थांबायला तयार नाहीत. दरवर्षी दोन कोटी तरुणांना रोजगार देवू म्हणणारे आज त्या विषयावर बोलत नाहीत. सत्ता लोकांच्या भल्यासाठी वापरायची असते. मात्र केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरु आहे, अशी टीका राष्ट्रवादी कॉंग्रेसशरद पवारगटाचे नेतेशरद पवारयांनी चोपडा येथे आयोजित सभेत केली.

चोपडा येथे शुक्रवारी दुपारी जाहीर सभा झाली. त्यात ते बोलत होते. ते म्हणाले की, हमीभाव मिळावा म्हणून दिल्लीत शेतकऱ्यांनी आंदोलन केले. वर्षभर ते आंदोलन चालले. मात्र तिथं जायला सत्ताधाऱ्यांना वेळ मिळाला नाही. उलट शेतकऱ्यांवर गोळ्या चालवल्या गेल्या, आंदोलनात ७०० शेतकऱ्यांनी आपले जीव गमावले पण सरकारला काहीही फरक पडला नाही. शेतीप्रधान देशात शेतकऱ्यांची अशी अवस्था ही देशासाठी चांगली बाब नक्कीच नसल्याचे ते म्हणाले.चोपडा येथील सभेची वेळ सकाळी १० : ३० वाजेची होती. प्रत्यक्षात १ : ३० वाजता शरद पवार हे सभास्थळी पोचले. त्यामुळे सुमारे तीन तास कार्यकर्ते, पदाधिकारी भर उन्हात ताटकळत होते.

# महाराष्ट्रातला सहकार कोणी मोडीत काढला?

## अमित शाह यांचा शरद पवारांना सवाल

**सांगली :** महाराष्ट्र म्हणजे सहकराची भूमी होती, मात्र इथला सहकार मोडीत काढण्याचे पाप कोणी केलं ? असा सवाल केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांनी शरद पवार यांना भर सभेत विचारला.

ते विटा येथे सांगली लोकसभा मतदार संघाचे भाजपचे उमेदवार संजयकाका पाटील यांच्या प्रचार सभेत बोलत होते. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, कामगार मंत्री सुरेश खाडे, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, राजेंद्र देशमुख, आमदार गोपीचंद पडळकर, सुधीर गाडगीळ आदी प्रमुख उपस्थित होते.



अमित शहा म्हणाले , महाराष्ट्रात आशिया खंडातील सर्वात मोठा सहकारी साखर कारखाना होता, तो कोणी बंद पडला ? , राज्यात २०२ सहकारी साखर कारखाने होते, त्यापैकी अवघे १०१ शिल्लक राहिले. महाराष्ट्रात ३४ सहकारी जिल्हा बँका होत्या त्यापैकी आता केवळ तीन ते चार शिल्लक राहिल्या आहेत. शरद पवार स्वतः सहकार मंत्री सुद्धा होते, त्यामुळे त्यांनी या सहकारी संस्था कोणी मोडीत काढल्या, याचे उत्तर द्यावे. असेही शहा यावेळी म्हणाले.

### भारत देश म्हणजे किराणा दुकान नाही

**अमित शहा म्हणाले, इंडिया आघाडीत प्रधानमंत्री पद घेतील अशी एकही व्यक्ती नाही, त्यामुळे ते हे पद अदलून-बदलून वाटून घेतील, हा देश १३० कोटी जनतेचा आहे, आशा प्रकारे प्रधानमंत्री बदलून देश चालणार नाही, भारत देश म्हणजे किराणामलाचे दुकान नाही, मोदी ही एकच व्यक्ती आहे, जी देश सुरक्षित चालवू शकते. असा दावा त्यांनी यावेळी केला.**

### उद्धव ठाकरेंना विचारला सवाल

**यावेळी बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी उद्धव ठाकरे यांना नकली शिवसेना म्हणून उद्देशून सवाल उपस्थित केले, ते म्हणाले सीएए लागू केला, ३७० कलम हटवले, राम मंदिर बांधले, पीएफआय वर बंदी आणली, हे निर्णय आम्ही घेतले, याबाबत त्यांनी त्यांची भूमिका जाहीर करावी, मात्र ते याचे उत्तर देणार नाहीत याचा मला विश्वास आहे, कारण त्यांना त्यांचा नवीन मतदार नाराज करायचा नाही, असेही शहा यावेळी म्हणाले.**

मंदिर बांधली, मतदान द्या

अमित शहा यांनी उपस्थित लोकांना आम्ही राम मंदिर, महाकाल मंदिर, केदार धाम, अशी अनेक मंदिरे बांधली आणि सुधारित केली, असं सांगून मतदान देण्याचे आवाहन केलं.

# गुरुवारी हळदीचे हे ५ उपाय
# तुमचे नशीब बदलतील



**हिंदू** धर्मात प्रत्येक दिवसाचे स्वतःचे महत्त्व आहे. प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवतेला समर्पित असतो. तसेच तो विशेष दिवस त्या दिवसाच्या ग्रहाला समर्पित आहे. सर्व देवतांना त्यांच्या आवडीनुसार वेगवेगळे भोग अर्पण केले जातात. तसेच दिवसाला अनुसरून काही उपाय केले तर ते खूप फायदेशीर ठरतात. गुरुवार हा भगवान विष्णूला समर्पित आहे. या दिवशी श्रीहरींना फक्त पिवळ्या रंगाच्या वस्तू अर्पण केल्या जातात. या दिवशी हळदीचे विशेष महत्त्व आहे. हळद ही त्याच्या आवडत्या गोष्टींपैकी एक आहे. या दिवशी श्रीहरीला हळदीचा टिळा लावून उपवासात वापरल्याने ते लवकर सुखी होतात आणि भक्तांचे दुःख दूर होतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे. यासोबतच गुरुवारी हळदीचे काही उपाय केले तर तुमचे नशीब बदलू शकते. या उपायांबद्दल जाणून घेऊया.

**हळदीचे हे उपाय गुरुवारी करा**

■ जर तुम्हाला गुरुवारी काही कामासाठी बाहेर जावे लागत असेल तर या दिवशी सकाळी गणेशाची पूजा केल्यानंतर त्यांच्या कपाळावर हळदीचा टिळा लावावा आणि मगच घराबाहेर पडावे. असे केल्याने तुम्हाला कामात यश मिळेल.


■ घरामध्ये वास्तुदोष असल्यास घराच्या कोपऱ्यात हळद फवारल्याने वास्तुदोष दूर होतात असे म्हणतात.

■ रात्री वाईट स्वप्ने तुमची साथ सोडत नसतील तर हळदीच्या गाठीवर कळवा किंवा मोळी बांधा. यानंतर ते डोक्यावर ठेवून झोपावे. तुम्हाला स्वतःच फरक दिसू लागेल.

■ आर्थिक तंगीमुळे त्रस्त असाल तर गुरुवारी हळद आणि अक्षता घेऊन विष्णुसहस्त्रनामाचे पठण करावे. असे केल्याने भगवान विष्णू प्रसन्न होतात आणि कृपा करतात. असे केल्याने आर्थिक संकटातून सुटका होते.

■ पैशाची कमतरता दूर करण्यासाठी गुरुवारी एका कपड्यात ५ अख्खी हळद बांधा. मग ती लॉकर, कपाट, तिजोरी किंवा कुठेही पैसे ठेवतात तिथे ठेवा. असे केल्याने पैशांची कमतरता दूर होते.

# चिचुंद्री घरात फिरत असेल तर...



जगात अनेक गोष्टी आहेत, त्यापैकी काही शुभ मानल्या जातात तर काही अशुभ. अशा स्थितीत उंदरासारख्या आकाराची चिचुंद्री घरात असणे शुभ मानले जाते. आपल्याला माहीत असणे आवश्यक आहे की चिचुंद्री तपकिरी, पांढरा, काळा आणि बेज या रंगाची असते. यासह असे मानले जाते की चिचुंद्री एक अतिशय धोकादायक प्राणी आहे आणि ज्यात उंदीर आणि साप खाण्याची क्षमता आहे. होय, घुबड वगळता, कोणीही ते खाण्याची हिंमत करू शकत नाही, परंतु आज आम्ही तुम्हाला चिचुंद्री घरात असल्याचे फायदे आणि नुकसान देखील सांगणार आहोत.

■ असे म्हटले जाते की, जर चिचुंद्री व्यक्तीभोवती फिरल्यास समजून घ्यावं की नजीकच्या भविष्यात त्याला काही मोठा फायदा होणार आहे.

■ त्याचप्रमाणे जर चिचुंद्री घराभोवती फिरत असेल तर त्या घराची आपत्ती टळते.

■ असे मानले जाते की, ज्या व्यक्तीला दिवाळीच्या रात्री चिचुंद्री दिसते तिचं भाग्य उजळतं. चिचुंद्री बघण्याचा अर्थ असा की, आपण खूप भाग्यवान आहात आणि पैशाशी संबंधित आपल्या सर्व समस्या संपणार आहेत.

■ ज्या घरात चिचुंद्री फिरत असेल तर त्या घरात लक्ष्मीचे आगमन होते. मात्र, ज्या घरात स्वच्छता जास्त असते, तिथे चिचुंद्री येण्याची शक्यता कमी असते.

■ जिथे चिचुंद्री आहे तिथे उंदीर, साप, कीटक आणि इतर प्रकारचे प्राणी येण्याची भीती नसते.

■ जिथे चिचुंद्री आहे तिथे बॅक्टेरिया येत नाही, कारण ती न दिसणारे बॅक्टेरिया सुद्धा खाते.

■ या झाल्या शास्त्राप्रमाणे ऐकलेल्या गोष्टी, परंतु चिचुंद्री घरात असल्याचे नुकसान देखील आहेत.

■ चिचुंद्रीच्या थुंकीत काळ्या सापात असणारे इतके भयंकर विष असतं. असे म्हटले जाते की, जर चिचुंद्री आपल्या शरीराच्या कोणत्याही भागावर थुंकली तर तो भाग सुन्न होतो. डोक्याच्या केसांवर थुंकल्यास त्या भागातील केस कायमचे गळून जातात.

■ घरात चिचुंद्री असेल तर घरातील अन्नाचे संसर्ग होण्यापासून संरक्षण करावे, कारण चिचुंद्रीची थुंक विषारी असते. अन्न संक्रमित झाल्यास आरोग्याला खूप नुकसान होऊ शकतं.

■ चिचुंद्री मुलांना चावल्यास शरीरात विष पसरू शकतं. असे म्हटले जाते की, कोणताही प्राणी ज्याला चिचुंद्री चावते किंवा त्याची शिकार करते, तेव्हा तिचे दात लागल्यावर काही सुचत नाही, मेंदूत धुके पसरतं, श्वास घेण्यास त्रास होतो आणि त्यानंतर तो अर्धांगवायू होतो.

■ रात्री, जर चिचुंद्रीने मुलांच्या पायाच्या बोटांना खायला सुरुवात केल्यास माहीत सुद्धा पडत नाही. याचे कारण असे आहे की, चिचुंद्री चावण्याआधी थुंकीने तो भाग सुन्न करते.

■ चिचुंद्री चावल्यास 'अँटी रेबीज इंजेक्शन' दिलं लागतं. कुत्रे, मांजरी, वटवाघळे, उंदीर, शिंपले, मुंगूस, कोल्हे, वाघ, सिंह आणि इतर सस्तन प्राण्यांच्या चाव्यामुळे रेबीज होण्याचा धोका वाढतो. यामुळे होणाऱ्या आजाराला हायड्रोफोबिया म्हणतात. हायड्रोफोबियामुळे रुग्ण मरू देखील शकतो, म्हणून याला हलक्यात घेऊ नये, चिचुंद्री एक धोकादायक जीव आहे.

# झुरळांना घराबाहेर ठेवण्यासाठी स्वयंपाकघरातील 'हा'च पदार्थ ठरणार फायदेशीर



**झुरळ** हा निरूपद्रवी कीटक आहे. मात्र त्याला पाहून अनेकांची भंबेरी उडते, काहींना झुरळ किळसवाणा वाटतो. मात्र स्वयंपाकघरात झुरळांचा वावर असणं म्हणजे अनेक आजारांना आमंत्रण असते. प्रामुख्याने रात्रीच्या वेळेस झुरळांचा वावर अधिक असतो. त्यामुळे आपल्या नकळत नेमके कुठे झुरळ फिरते हे आपल्याला ठाऊक नसते. अनेक घरांत झुरळांचा वावर टाळण्यासाठी केमिकलयुक्त कीटकनाशकं फवारली जातात. मात्र केमिकल्स धोकादायक असल्याने त्यामुळे ॲलर्जी, श्वसनाचे त्रास उद्‌भवण्याचा धोका अधिक असतो.

**झुरळ हटवण्याचा घरगुती उपाय** - झुरळांना हटवण्यासाठी केमिकलयुक्त पदार्थ वापरण्याऐवजी स्वयंपाकघरातील तमालपत्र हा मसाल्याचा पदार्थ फायदेशीर ठरतो. तमालपत्रामुळे जशी पदार्थांना चव येते तसाच त्याचा वापर घरातील झुरळांना लांब ठेवण्यासाठीदेखील केला जातो.

**कसा कराल तमालपत्राचा वापर?** - झुरळांना लांब ठेवण्यासाठी तमालपत्र वापरणार असाल तर त्याची अगदी बारीक पूड करा. तमालपत्राची पूड स्वयंपाकघरात पसरवून ठेवा. रात्रीच्या वेळेस घरात तमालपत्राची पानं जाळा. त्याच्या मंद गंध घरात आणि प्रामुख्याने स्वयंपाकघरात दरवळू द्यावा. यामुळे झुरळांना दूर ठेवण्यास मदत होते.

**साखर आणि बेकिंग सोडा** - अनेक घरांमध्ये साखर आणि बेकिंग सोडा हे मिश्रण स्वयंपाकघरात ठेवले जाते. या मिश्रणामुळे झुरळांना दूर ठेवण्यासाठी मदत होते. साखरेकडे झुरळ आकर्षिले जातात, परंतु हे मिश्रण झुरळांसाठी विषारी ठरतं.

# रत्नजडित अंगठी घातल्यानंतरही नशीब बदलत नसेल तर करा हे काम



भाग्य उजळविण्यासाठी तसेच संकटांपासून मुक्त होण्यासाठी रत्न धारण केले जातात. रत्न शास्त्रानुसार रत्ने परिधान करताना पूर्ण काळजी घेतली तरच ते चांगले काम करतात. अनेक वेळा असे देखील होते की रत्ने चांगले परिणाम देत नाहीत, म्हणून जाणून घ्या काय करावे.

■ कोणतेही रत्न धारण करण्यापूर्वी, त्याने आपल्या प्रमुख देवतेच्या चरणांना स्पर्श किंवा ध्यान करावे.

■ रत्न धारण करण्यापूर्वी चांगल्या ज्योतिषाचा सल्ला घ्यावा. त्यानंतरच रत्न धारण करावे.

■ रत्नशास्त्राच्या तज्ज्ञांच्या मते, कोणतेही रत्न धारण केल्यानंतर ते पुन्हा पुन्हा बदलू नये. रत्न किमान ६ महिने धारण केले पाहिजे. तेव्हाच रत्नाचा प्रभाव पडतो.

■ तुटलेले रत्न कधीही परिधान करू नये असे ज्योतिषशास्त्राच्या तज्ज्ञांचे मत आहे. याउलट, परिधान केलेल्या रत्नामध्ये तडे असल्यास ते ताबडतोब काढून टाकावे.

■ ज्योतिषशास्त्राच्या तज्ज्ञांच्या मते, जीवनात प्रगती आणि प्रगतीसाठी प्रत्येक व्यक्तीने आरोहीचे रत्न, भाग्यस्थान म्हणजेच नववे घर आणि पाचव्या घरातील रत्न धारण केले पाहिजे.

# वर्किंग वुमन्सनी उन्हाळ्यात घ्या अशी त्वचेची काळजी!



■ उन्हाळ्यात तुम्ही जितक्या वेळ्या चेहरा धुवाल तितके चांगले. शक्य असल्यास उन्हाळ्यात तुळस आणि कडुलिंबयुक्त फेसवॉश वापरा. त्यामुळे त्वचेच्या अतिरिक्त तेलकटपणापासन सुटका मिळेल. पिंपल्स कमी होण्यास मदत होईल. कडुलिंबातील औषधी गुणधर्मांमुळे त्वचा स्वच्छ होऊन चमकदार होण्यास मदत होईल.

■ ऑफिसमध्ये काम करणाऱ्या महिलांनी मॅट मॉइश्चरायजरचा वापर करावा. मात्र कामानिमित्त बाहेर फिरावे लागत असेल तर सन्सक्रीमचा अवश्य वापर करा. आठवड्यातून तीनदा स्क्रबचा वापर करा. त्यामुळे मृत त्वचा निघून त्वचा चमकदार होण्यास मदत होते.

■ आठवड्यातून एकदा फेसमास्क जरुर वापरा. अनेकदा कामाच्या नादात आपण त्वचेकडे फारसे लक्ष देत नाही. त्यामुळे चेहरा सुंदर व प्रेश दिसण्यासाठी आठवड्यातून एकदा फेसमास्क अवश्य लावा. त्यामुळे त्वचा हेल्दी राहील.

■ शक्य असल्यास किंवा आवडत असल्यास तुम्ही लाइट मेकअप करु शकता. त्याचबरोबर वेट टिश्यूसोबत ठेवा. घामाच्या दुर्गंधीपासून दूर राहण्यासाठी बॉडी स्प्रे कॅरी करा.

# भाजलेल्या जीभेचा त्रास कमी करतील हे घरगुती उपाय



**अनेकदा** वाफाळती चहा, कॉफी पटकन तोंडाला लावली तर जीभ भाजते. गरम पदार्थांचा जीभेला चटका बसला की सहाजिकच पुढील अनेक दिवस कोणताही पदार्थ खाल्ला तरीही त्याची कोणतीच चव लागत नाही.

जीभ भाजल्यानंतर पुन्हा चविष्ट पदार्थांचा आनंद घेण्याचं सुख अनुभवयाचं असेल तर हे काही घरगुती आणि नैसर्गिक उपाय नक्की करून पहा.

■ जीभ भाजल्यानंतर नाकाऐवजी थेट तोंडाने श्वास घ्या. याकरिता जीभ थोडी बाहेर काढा म्हणजे थंड हवेमुळे जीभेला झालेले नुकसान कमी होण्यास मदत होते. मेन्थॉल च्युइंगममुळेही हा त्रास कमी होण्यास मदत होते.

■ बर्फाचा गोळा काही वेळ तोंडात ठेवा. यामुळेही जीभेला होणारा त्रास आटोक्यात ठेवता येऊ शकतो. बर्फ नसल्यास गार पाण्याने गुळण्या कराव्यात.

■ थंडगार दूध, दहीचे सेवन केल्यानेही जीभेला आराम मिळण्यास मदत होते.

■ भाजलेल्या जीभेवर तुम्ही साखरेचे दाणे किंवा मध लावल्यानेही फायदा मिळू शकतो. मधामध्ये दाहशामक गुणधर्म असतात.

■ भाजलेल्या जीभेवर व्हिटॅमिन ई तेल लावावे. बाजारात व्हिटॅमिन ई च्या कॅप्सुल मिळतात. तुम्ही या कॅप्सुल्स उघडून त्यामधील जेल जीभेवर लावल्यास जखम कमी होण्यास मदत होते.

■ भाजलेल्या जीभेवर कोरफडीचा गर लावल्यास त्रास कमी होण्यास मदत होते. बर्फासोबत कोरफडीचा गर चोखू शकता. कोरफडीचा गर थोडा कडवट असू शकतो. पण यामुळे त्रास कमी होण्यास मदत होते.

जीभ भाजल्यानंतर फळं किंवा खूप प्रमाणात मीठ असलेले पदार्थ खाणे टाळा. यामुळे भाजलेली जीभ अजूनच त्रासदायक ठरू शकते.

# ऑनलाईन खरेदी करताना 'या' ५ महत्त्वाच्या गोष्टी ठेवा लक्षात



**स्मार्टफोन** आणि इंटरनेटचा वापर वाढल्याने सर्वकाही ऑनलाईन झाले आहे. आज प्रत्येक गोष्ट तुम्ही सहज स्मार्टफोनच्या एका क्लिकवर करू शकता. अगदी तुम्ही घरबसल्या जेवण ऑर्डर करण्यापासून ते कपडे खरेदी करू शकता. प्रवासासाठी तिकीट बुक करणे देखील ऑनलाईनमुळे सहज शक्य आहे. प्रामुख्याने शॉपिंगसाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर केला जातो. घरात उपयोगी येणाऱ्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस, कपडे, स्मार्टफोन्ससह अनेक वस्तू सहज ऑनलाईन उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे बाजारात जाऊन खरेदी करण्याऐवजी तुम्ही सहज स्वस्तात ऑनलाईन मागवू शकता. मात्र, ऑफर्स आणि डिस्काऊंटच्या नादात ऑनलाईन खरेदी करताना नुकसान देखील होऊ शकते. त्यामुळे ऑनलाईन शॉपिंग करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. ऑनलाईन खरेदीचे जसे फायदे आहेत, तसे तोटे देखील आहे. त्यामुळे सुरक्षित ऑनलाईन शॉपिंग करण्यासाठी तुम्ही पुढील टिप्स फॉलो करू शकता.

■ **वस्तूच्या फीचर्स आणि किमतीबाबत घ्या माहिती** : ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्म्सवरून इलेक्ट्रॉनिक वस्तूंची प्रामुख्याने विक्री होते. यामध्ये स्मार्टफोन, लॅपटॉप, व्हिडीओ गेम, इयरफोन्ससह इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा समावेश आहे. परंतु, हे प्रोडक्ट्स कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध असण्यासोबतच इतर ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्म्सवर देखील उपलब्ध असतात. अशावेळी कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर प्रोडक्ट्सच्या किंमत आणि फीचर्सबाबत माहिती घ्यावी. त्यानंतर इतर साइट्सवर उपलब्ध असलेल्या प्रोडक्ट्सशी तुलना करून वस्तू खरेदी करावी. जेणेकरून, तुम्हाला प्रोडक्टविषयी सविस्तर माहिती मिळेलच, सोबतच ऑफर्सचा देखील फायदा होईल.

■ **रिव्ह्यू आणि रेटिंग तपासा** : ऑनलाईन वेगवेगळ्या कंपन्यांचे एकाच प्रकारचे प्रोडक्ट्स उपलब्ध असतात. अशावेळी आपण कोणत्या कंपनीची वस्तू खरेदी करावी याबाबत गोंधळून जातो. अशा स्थितीमध्ये प्रोडक्ट आणि कंपनीला युजर्सकडून मिळालेले रेटिंग आणि रिव्ह्यू तपासावे. युजर्स आपल्या अनुभवानुसार वस्तू चांगली आहे की नाही, हे सांगत असतात. ज्याचा फायदा तुम्हाला वस्तू खरेदी करताना होतो. अनेकदा ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्म्सवर प्रोडक्ट्सचे फेक रिव्ह्यू देखील दिले जातात. त्यामुळे वस्तूची संपूर्ण माहिती घेऊनच खरेदी करावे.

■ **सुरक्षित वेबसाइटवरून करा खरेदी** : अनेक अशा ई-कॉमर्स वेबसाइट्स उपलब्ध आहेत, जेथे तुम्हाला डिस्काऊंटसह वस्तू मिळतील. मात्र, डिस्काऊंट आणि ऑफर्सच्या नादात कोणत्याही वेबसाइटवरून वस्तू खरेदी करणे तुम्हाला महागात पडू शकते. अनेकदा तुम्ही पाहिले असेल की स्वस्तात वस्तू खरेदी करण्याच्या नादात कोणत्याही साइट्सवरून शॉपिंग केली जाते. मात्र, यामुळे पैसे तर जातात व चांगली वस्तू देखील मिळत नाही. तसेच, सुरक्षित असलेल्या वेबसाइटवरून वस्तू खरेदी करावी. यामुळे तुमचे पैसे देखील सुरक्षित राहतील.

■ **पासवर्ड आणि बँकिंग माहिती सेव्ह करणे टाळा** : ई-कॉमर्स साइट्सवर शॉपिंग करताना अनेकदा बँकिंग माहिती सेव्ह करण्याची चूक अनेकजण करतात. याशिवाय, पासवर्ड देखील सेव्ह करतात, जेणेकरून पुन्हा लॉगइन करताना पासवर्डची गरज पडणार नाही. तुमचा स्वतःचा लॅपटॉप असल्यास ही मेथड तुम्ही वापरू शकता. परंतु, इतरांच्या मोबाईल अथवा लॅपटॉपवरून शॉपिंग करत असताना बँकिंग माहिती व पासवर्ड कधीही सेव्ह करू नये. तुमच्या माहितीचा चुकीचा वापर होऊ शकतो. पासवर्डऐवजी तुम्ही वन टाइम पासवर्ड म्हणजेच ओटीपीचा वापर करू शकता.

■ **वस्तूवरील गॅरंटी-वॉरंटी नक्की पाहा** : स्वस्तात उपलब्ध असल्याने अनेकदा आपण कोणतीही वस्तू न तपासताच खरेदी करतो.

आपण वस्तूवर उपलब्ध असलेल्या गॅरंटी व वॉरंटीकडे दुर्लक्ष करतो. मात्र, यामुळे तुमचे नुकसान होऊ शकते. खासकरून इलेक्ट्रॉनिक वस्तू मागवताना त्यावरील वॉरंटीबाबत जाणून घ्यावे. प्रोडक्टला रिटर्न करण्याबाबत, कॅश ऑन डिलिव्हरीबाबत देखील सविस्तर जाणून घ्यावे. जेणेकरून, तुम्हाला एखादी वस्तू न आवडल्यास परत देखील करता येईल. या टिप्स फॉलो करून तुम्ही सुरक्षित ऑनलाईन शॉपिंग करू शकता.

# मध सेवन करा, निरोगी राहा!

**तुम्ही** आजाराने वैतागला असाल तर घाबरून जाऊ नका. कारण आता मधानेदेखील त्यावर उपचार करू शकता. घरगुती उपयांमध्ये मधाचा नेहमी उल्लेख होत असतो. गुणांसह गोडपणा कोणत्या पदार्थात आढळत असेल तर तो आहे मध. तसे पाहिले तर मध प्रत्येक मोसमात लाभदायक असतो. मात्र उन्हाळ्यात तो जास्त उपयुक्त ठरतो.

रोगप्रतिकारक गुणांमुळे मध आरोग्यास मदत तर करतोच पण त्याचबरोबर रूप-रंग उजळण्यातही उपयोगी आहे.

अलीकडेच जर्मनीत झालेल्या एका अभ्यासानुसार मधात आढळणारा अँटी ऑक्सिडंट घटक शरीरच्या पेशी क्षीण होण्यापासून रक्षण करतो.

बहुधा त्यामुळेच जुन्या काळात लोक भरपूर प्रमाणात मध सेवन करीत असत. आजही अरब देशांतील लोक आपल्याला निरोगी ठेवण्यासाठी नियमितपणे मध सेवन करतात. मधात मोठ्या प्रमाणात कॅलरी आढळतात. आरोग्यासाठी ती खूप गुणकारी मानली जाते.



# कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आहारात या पदार्थांचा करा समावेश

**चांग**ले आरोग्य राखण्यासाठी योग्य आणि पोषक आहार महत्त्वाचा असतो. हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे पोषक आहाराकडे दुर्लक्ष केले जाते आणि त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी करायचे असल्यास खालील पदार्थांचा आहारात नक्की समावेश करा.

ऑलिव्ह ऑईल- ऑलिव्ह ऑईलमध्ये असलेल्या अँटी ऑक्सिडंट्समुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते.

**लसूण** - लसणाचा आहारात नेहमी समावेश करावा. यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

**सुकामेवा** - अक्रोड, बदाम यासारखा सुकामेवा केवळ चविष्टच नसतो, तर आरोग्यासाठीही तितकाच फायदेशीर. सुकामेवा खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित राहते. तसेच हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

**ॲवोकॅडो**- ॲवोकॅडोमध्ये बीटा-सिस्टोसेरॉल मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते.

**मासे** - आहारात नियमितपणे माशांचा समावेश केल्यास हृदयाचे आरोग्य चांगले राहते. यात मोठ्या **प्रमाणात ओमेगा**-३ फॅटी ॲसिड्स असतात. ज्यामुळे ब्लडप्रेशर कमी होते.

**ओटमील** - ओटमीलमध्ये सॉल्युबल फायबर असतात. ज्यामुळे वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

# आरोग्यासाठी गुणकरी वेलची, वाचा तिचे फायदे

**वेलची** एक सुगंधी मसाला आहे. वेलचीच्या स्वादाने स्फूर्ती येते. वेलचीचा उपयोग गोड पदार्थांत चव वाढविण्यासाठी करण्यात येतो. तसेच वेलचीचा उपयोग माऊथ फ्रेशनर म्हणून केला जातो. वेलचीमध्ये लोह, व्हिटॅमिन सी, जीवनसत्व ब गटातील एक महत्त्वाचा घटक आहे. लाल रक्त पेशी निर्मितीत एक महत्त्वाची भूमिका वेलची बजावते. वेलची खाण्याचे अनेक फायदे आहेत.

■ तीन वेलची, आल्याचा एक छोटा तुकडा, थोडीसी लवंग आणि धणे वाटून त्याची पावडर गरम पाण्याबरोबर घेतल्याने पचनाबाबत जी समस्या असेल ती दूर होते.

■ वेलचीमध्ये एक अँटी बॅक्टेरियल गुण असतो. तोंडातील किंवा श्वसनाबाबत दुर्गंधी असेल तर ती दूर होते. दररोज एक वेलची खा किंवा चहातून वेलचीचा आस्वाद घ्या.

■ ॲसिडीटीपासून तुम्हाला सुटका हवी असेल तर वेलची उत्तम. त्यासाठी वेलची चावून चावून खाणे किंवा चघळणे चांगले. त्यातून निघणारे तेल तोंडातील लाळेतील ग्रंथीत मिळसते. त्यामुळे तुमचे पोट साफ होते.

■ वेलची खाल्ल्याने चांगली भूक लागते. वेलची चावून खाल्ल्याने ॲसिडीटी दूर होते शिवाय होणारी जळजळ थांबते.

## निवडक महामुंबई

### नऊ जणांकडून सहलीसाठी घेतलेल्या २० लाखांचा अपहार

**मुंबई :** मार्च महिन्यात साऊथ आफिका येथे आयोजित करण्यात आलेल्या सहलीसाठी नऊ जणांकडून सुमारे २० लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी ट्रॅव्हल्स व्यावसायिक तेजस महेंद्र शहा याच्याविरुद्ध कांदिवली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यातील तक्रारदार कांदिवली येथे राहत असून, एका सॉफ्टवेअर कंपनीत महाव्यवस्थापक म्हणून काम करतात. मार्च महिन्यांत त्यांच्या कुटुंबीयांसह नातेवाईक आणि मित्रांनी साऊथ आफ्रिकेला जाण्याचा प्लान केला होता. त्यासाठी ते ट्रॅव्हल्स कंपनीच्या शोधात होता. याच दरम्यान त्यांची ओळख तेजस शहा याच्याशी झाली होती. तेजसची पूर्वा हॉलिडेज नावाची एक कंपनी असून, त्याने त्यांच्या सहलीसाठी एक पॅकेज दिले होते. या पॅकेजनंतर त्यांनी नऊजणांचे बुकींग करून तेजसच्या कंपनीच्या बँक खात्यात २० लाख ४१ हजार रुपयांचे पेमेंट केले होते. मार्च महिन्यांत त्यांनी तेजसला सहलीबाबत विचारणा केली असता त्याच्याकडून त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. तो उडवाउडवाचे उत्तरे देऊन त्यांना टाळण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या कार्यालयात जाऊन पाहणी केल्यानंतर तेजसने त्याचे कार्यालय बंद करून पलायन केल्याचे दिसून आले.

### दागिन्यांच्या अपहारप्रकरणी मध्य प्रदेशच्या व्यापाऱ्याविरुद्ध गुन्हा

**मुंबई :** हिरेजडित सोन्याचा दागिन्यांचा अपहार करून एका व्यापाऱ्याची सुमारे ९९ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मध्य प्रदेशच्या दोन व्यापाऱ्याविरुद्ध डी. बी. मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अंकुर विमलकुमार जैन आणि भारतेंदूसिंह सुबोधकुमार मौर्या अशी या दोघांची नावे आहे. एक कोटीचे बोगस सोन्याची लगड देऊन या दोघांनी तक्रारदार व्यापाऱ्याची फसवणूक केली आहे. यातील तक्रारदार व्यापारी असून, ते मालाड येथे राहतात. त्यांचा हिरेजडित सोन्याचे दागिने विक्रीचा व्यवसाय आहे. अंकुर जैन हा त्यांचा परिचित व्यापारी असून, त्याच्यासोबत त्यांचे अनेकदा दागिन्यांचा व्यवहार झाला होता. फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान त्याने त्यांना एक कोटींची सोन्याची लगड दिली होती. त्या मोबदल्यात त्याने त्यांच्याकडून ९९ लाख रुपयांचे हिरेजडित दागिने घेतले होते.

### 'चिंचपोकळीच्या चिंतामणी'ची २०२४-२५ची कार्यकारिणी जाहीर

**मुंबई :** गिरणगावातील चिंचपोकळीचा चिंतामणी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाचे यंदाचे सार्वजनिक गणेशोत्सवाचे १०५वे वर्ष असून, मंडळाची १०४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. २०२४ - २०२५ या वर्षासाठी अध्यक्षपदी विठ्ठलदास पै, मानदसचिवपदी वासुदेव सावंत तसेच कोषाध्यक्षपदी विकास सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी प्रदिप हरियाण, अनंत घाडीगावकर, अरविंद पवार तसेच उपमानदसचिव म्हणून राजेश गावडे, सिध्देश तावडे, प्रविण राणे, विकास शिंदे आणि ग्रंथालय/कार्यालय प्रमुख राजेश चव्हाण व आरोग्य केंद्र प्रमुख प्रथमेश सकपाळ यांची निवड करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र श्रमिक कामगार मेळावा उत्साहात

**मुंबई :** महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून 'महाराष्ट्र श्रमिक सभे'चे संस्थापक सरचिटणीस केतन कदम यांनी नुकतेच 'कामगार मेळावा २०२४'चे आयोजन केले होते. या निमित्ताने 'प्रगतशील कोकण सामाजिक संस्था' या संस्थेच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. वेस्टर्न बँक्वेट, शेकाप भवन, माहीम येथे हा मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला जगातील कामगारांनी एकत्र यावे हे कार्ल मार्क्स यांच्या संदेश उच्चारून शेतकरी कामगार पक्षाचे नेते राजू कोरडे यांनी मार्दर्शन केले तसेच संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर नारकर यांनी कोकणातील प्रेरिकांच्या सोडवलेल्या प्रश्नांसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी घरेलू महिला कामगार मुंबई विभाग अध्यक्षा स्नेहा लोखंडे-अहिरे, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल)चे अविनाश कदम, मंगेश जाधव, नरेंद्र जाधव, 'प्रगतशील कोंकण सामाजिक संस्थे'चे सरचिटणीस योगेश कांबळे, पांडुरंग तोरसकर यांच्यासह कंत्राटी कर्माचारी आणि घरेलू कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केतन कदम, तर सूत्रसंचालन उमेश मोहिते यांनी केले.

# अजब पालिकेचा गजब कारभार

## नव्या लाद्या काढून नवीन लाद्या बसवण्याचे काम
## सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गाची दुरुस्ती


**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाला लागून असलेल्या भुयारी मार्गाची दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे; मात्र हे काम करत असताना नव्यानेच काढलेल्या लाद्या काढून नवीन लाद्या बसवण्याचे काम जोमाने सुरू आहे. त्यामुळे अजब पालिकेचा गजब कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे.

मुंबईतील पुलांचे नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातील अहवालानुसार, काही भुयारी मार्गाची दुरुस्तीची शिफारस करण्यात आली आहे. यात सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गाची दुरुस्ती करण्याचे सुचवण्यात आले आहे. त्यानुसार सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हे काम हाती घेतल्यानंतर नव्यानेच बसवलेल्या लाद्या काढून नवीन लाद्या बसवण्याचे काम जोमाने सुरू आहे. त्यामुळे पालिकेच्या कामकाजावर प्रश्न चिन्ह उपस्थित केला जात आहे.

सीएसएमटी स्थानक मध्य रेल्वेच्या स्थानकापैकी सर्वांत महत्त्वाचे स्थानक. याठिकाणी दररोज लाखो प्रवाशांची ये-जा सुरू असते. दक्षिण मुंबईत कामानिमित्त येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. फोर्ट, नरिमन पॉइंट, कुलाबा आदी ठिकाणी कामानिमित्त येणारे हमखास सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गाचा वापर करतात. पावसाळ्यात या गुळगुळीत लाद्या पादचाऱ्यांसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता अधिक आहे.

### पावसाळ्यात धोकादायक

सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गातील नव्या लाद्या काढून नवीन लाद्या बसवण्याचे काम सुरू आहे; मात्र नव्याने बसवण्यात येणाऱ्या लाद्या पावसाळ्यात पादचाऱ्यांसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. या लाद्या गुळगुळीत असल्याने पावसाळ्यात या लाद्यांवर पाय घसरून अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे एक तर नवीन लाद्या काढत नवीन लाद्या बसवण्याची काय गरज आणि नवीन लाद्या बसवताना पादचाऱ्यांचा विचार का केला नाही, असा सवाल प्रवाशांनी उपस्थित केला आहे.



### कामाचा अहवाल द्या

दरम्यान, सीएसएमटी स्थानकाजवळील भुयारी मार्गाची दुरुस्ती सुरू आहे. आतापर्यंत झालेल्या कामाचा अहवाल सादर करण्याचे निर्देश पालिकेच्या पूल विभागाने संबंधित ए वॉर्डास सांगितले आहे.

# ...अन्यथा चर्चगेट स्थानक जप्त करू

## पश्चिम रेल्वे प्रशासनाला हायकोर्टाचा दणका

**मुंबई :** लवादाच्या निर्णयाला गेली ९ वर्षे वाटाण्याच्या अक्षता लावणाऱ्या रेल्वे प्रशासनाचे उच्च न्यायालयाने चांगलाचे कान उपटले. न्यायमूर्ती अभय आहुजा यांनी आम्हाला कारणे सांगू नका चार आठवड्यांत ३ कोटी ९५ लाख ९४ हजार ७२० रुपये के.पी. ट्रेडर्स कंपनीला द्या, अन्यथा चर्चगेट रेल्वे स्थानकाची इमारत जप्त करू, असा इशाराच पश्चिम रेल्वे प्रशासनाला दिला आहे.



चर्चगेट येथील इमारतीत १९९८मध्ये साहित्य, मालाची हाताळणी व इतर कामाचे कंत्राट के. पी. ट्रेडर्स या कंपनीला देण्यात आले. त्यानंतर कंपनी आणि रेल्वे प्रशासनाचा वाद निर्माण झाला. अखेर वाद लवादाकडे गेला. लवादाने २०१५ साली कंपनीला ३ कोटी ९५ लाख ९४ हजार ७२० रुपये देण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिले; मात्र रेल्वे प्रशासनाने पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर के. पी. ट्रेडर्स या कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेत रेल्वे प्रशासनाच्या विरोधात याचिका दाखल केली. या याचिकेवर अभय आहुजा यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी रल्वे प्रशासनाने न्यायालयाकडे मुदत देण्याची विनंती केली; मात्र न्यायालयाने ही विनंती फेटाळून लावत चार आठवड्यांत ३ कोटी ९५ लाख ९४ हजार ७२० रुपये देण्याचे आदेश द्या, अन्यथा चर्चगेट रेल्वे स्थानकाची इमारत जप्तची कारवाई करण्यात येईल, अशी तंबीच रेल्वे प्रशासनाला दिली.

# भटक्या कुत्र्यांपासून सावधान!

**रेबीजमुक्त मुंबईसाठी पालिकेचा उपक्रम**

**मुंबई :** रेबीजमुक्त मुंबई यासाठी भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यात येत आहे. लसीकरणाबरोबर भटक्या कुत्र्यांपासून आपला बचाव करण्यासाठी काय करावे काय करू नये, याबाबत शाळा, कॉलेज, रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. रेबीज प्रशिक्षित दोनजण मुंबई शहर व दोन्ही उपनगरात जनजागृती मोहीम राबवत असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून, रात्री दूर दिवसाही भटक्या कुत्र्यांमुळे रस्त्यावरून ये-जा करणे जिकिरीचे झाले आहे. काही वेळा कुत्रा अंगावर धावून येण्यामागे मुलांचा खोळसाडपणा कारणीभूत ठरतो. त्यामुळे भटक्या कुत्र्यांपासून सावध राहावे, काय करावे, काय करु नये याबाबत शाळा, कॉलेज, रेल्वे स्थानकात जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. विशेषतः लहान मुलांचा चावा घेतल्याच्या घटना अधिक घडतात. त्यामुळे भटक्या कुत्र्यांपासून सावधान अशा प्रकारची जनजागृती मोहीम हाती घेतली आहे.

**शाळा, कॉलेज, रेल्वे स्थानकात जनजागृती मोहीम**



### 'हे' करू नका

- जेवताना, झोपताना व पिल्लांना स्तनपान करताना कुत्र्याला त्रास देऊ नये.
- कुत्र्यासमोर धावू नये, दगड किंवा एखादी वस्तू कुत्र्यावर फेकू नये.
- गुरगुरणारा कुत्रा अंगावर आल्यास झाडासारखे सरळ उभे राहा, ओरडू नका.

### कुत्रा चावला तर 'हे' करा

- लगेच ती जखम १५ मिनिटे वाहत्या पाण्यामध्ये साबण लावून धुवा.
- शक्य असल्यास आयोडिन, बीटाडीनने जखमेचे निर्जंतुकीकरण करा.
- जखम झाकून ठेवू नका किंवा झाकून घरगुती उपाय करू नका. यामुळे जखमेमध्ये सेप्टिक होऊ शकते.
- कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शनच्या संपूर्ण कोर्ससाठी ताबडतोब रुग्णालयात जा.

# पाच कोटींच्या खंडणीची मागणी; अविनाश जाधवसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंबई :** ज्वेलर्स व्यापाऱ्याच्या मुलाला मारहाण करून पाच कोटींच्या खंडणीची मागणी केल्याप्रकरणी मनसेचे ठाणे-पालघर विभागाचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्यासह तिघांविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक वादातून हा प्रकार घडल्याचे बोलले जाते. गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. चौकशीनंतर दोषी व्यक्तीविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

शैलेश जैन हे ज्वेलर्स व्यापारी असून, त्यांचा झव्हेरी बाजार येथे सोन्याचे दागिने विक्रीचा व्यवसाय आहे. वैभव ठक्कर हा त्यांचा परिचित असून, त्यांच्यात आर्थिक वाद सुरू आहे. बुधवारी शैलेश जैन याने वैभवला आर्थिक तडजोडीसाठी बोलाविले होते. यावेळी त्यांच्यात वाद झाल्याने त्याने अविनाश जाधव यांना ही माहिती दिली होती. त्यानंतर अविनाश जाधव हे त्यांच्या अंगरक्षक, चालक आणि इतर पाच ते सहा कार्यकर्त्यांसोबत तिथे आले होते. शाब्दिक वादानंतर त्यांनी शैलेश जैन यांचा मुलगा स्वामिल जैन याला मारहण करून धमकी दिली होती. त्यानंतर अविनाश जाधव यांनी त्यांच्याकडे पाच कोटीच्या खंडणीची मागणी केली होती. या घटनेनंतर त्यांनी अविनाश जाधव, वैभव ठक्करसह अन्य एका व्यक्तीविरुद्ध एल. टी. मार्ग पोलिसांत तक्रार केली होती. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर अविनाशसह तिघांविरुद्ध पोलिसांनी खंडणीसह मारहाण करणे आणि कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. खंडणीची मागणी केल्याच्या वृत्ताला अविनाश जाधव यांनी नकार दिला. वैभवच्या सांगण्यावरून आपण तिथे गेलो होतो. काही वेळाने त्यांनी पोलिसांना कॉल करून तिथे बोलावून घेतले होते; मात्र त्यांच्यात वाद झाल्याने त्यांनी आपल्याला कॉल केल्याचे अविनाश जाधव यांनी पोलिसांना सांगितले.

# नरेश गोयल यांच्या जामीन अर्जाचा निर्णय हायकोर्टाने राखून ठेवला



**मुंबई :** कॅनरा बँकेची तब्बल ५३८ कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणी मनी लॉँड्रिंगच्या आरोपाखाली अटकेत असलेले ७५ वर्षीय उद्योजक नरेश गोयल यांच्या जामिनाला ईडीने जोरदार विरोध केला. सध्या अर्जदार गोयल हे त्याच्या स्वतःच्या पसंतीच्या डॉक्टरांकडे उपचार घेत असल्याने आहेत. सुदृढ असल्याचा कोणताही वैद्यकीय अहवाल नाही. त्यामुळे त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देणे योग्य ठरणार नाही, किंबहुना न्यायालयाने त्यांची सुटका करण्याबाबत निर्णय घेणे अयोग्य नाही, असा दावा ॲड. हितेन वेणेगावकर यांनी केला. दरम्यान दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पूर्ण झाल्याने न्यायालयाने निर्णय राखून ठेवला असून, तो सोमवारी ६ मे रोजी जाहीर करण्याची शक्यता आहे.

मुंबई येथील खासगी रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी दाखल असलेल्या गोयल यांचा विशेष पीएमएलए न्यायालयाने १० एप्रिलला जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जामिनासाठी अर्ज दाखल करताना पीएमएलए कायद्याचा गैरवापर व ईडीच्या सुडबुद्धीला आव्हान दिले आहे. या अर्जावर न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार याच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी गोयल यांच्या वतीने लंडनहून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे माजी सॉलिसिटर जनरल हरिष साळवे यांनी युक्तिवाद केला.

### ६ मे रोजी निर्णय जाहीर करणार

ईडीच्या वतीने ॲड. हितेन वेणेगावकर याचिकेला जोरदार आक्षेप घेतला. गोयल हे त्याच्या स्वत:च्या पसंतीच्या डॉक्टरांकडे उपचार घेत आहेत ते तिथे सुरक्षित असले, तरी त्यांची प्रकृती ठीक नाही. वैद्यकीय उपचाराला प्राधान्य देणे गरजेचे असून, रुग्णालयातून त्यांना डिस्चार्ज देण्यात यावा असा कोणतेही वैद्यकीय अहवाल नाही, असे असताना त्यांना जामीन देणे योग्य नाही. न्यायालयाने हा युक्तिवाद ऐकून घेत निर्णय राखून ठेवत तो ६ मे रोजी जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले.

# नोकरीचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

**भाईंदर :** भाईंदर पूर्वेला नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कार्यालय थाटून परदेशात नोकरी लावण्याचे सांगून शेकडो जणांची फसवणूक करणाऱ्या तिघांच्या टोळीला नवघर पोलिसांनी अटक करत सहा लाख दोन हजार जप्त केले आहेत.

तक्रारदार पवन सिंग यांना आरोपींनी इगल प्लेसमेंट सर्व्हिस कंपनीद्वारे परदेशात नोकरीस लावण्याचे अमिष दाखवून त्यांचा पासपोर्ट स्वतःकडे ठेवून घेऊन आरोपीकडे कोणताही नोकरी लावण्याचा परवाना नसताना परदेशात नोकरी पाठवतो, असे सांगून फिर्यादीकडून एकुण ७९ हजार इतकी रक्कम घेवून फिर्यादीची फसवणूक केली त्यावरून नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलिसांच्या तपासाच्या दरम्यान अशाच प्रकारे एकूण १०० ते १५० तरुणांची आरोपींनी फसवणूक करून रुपये १० लाख २० हजार रुपये एवढ्या रक्कमेचा तपासात अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१, सहाय्यक पोलीस आयुक्त नवघर विभाग तसेच नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता सूचना केल्या. त्याप्रमाणे नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरपण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देऊन तांत्रिक विश्लेषण करून नमूद गुन्ह्यातील आरोपी अबरार अहमद मुक्तार शहा उर्फ अशपाक व वसिम ऊर्फ साहील यासिन शहा आणि मोहम्मद तारीक ऊर्फ फैजल कादरी अब्दुल गफार सिदिदकी यांना निष्पन्न करून आरोपींचा गुन्ह्यात सहभाग दिसून आल्याने आरोपीना उपरोक्त गुन्ह्यात अटक करण्यात आली.

# फसवणूकप्रकरणी दोन महिलांसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंबई :** फसवणूक प्रकरणी दोन महिलांसह सहा जणांविरुद्ध चारकोप पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या सहा जणांनी घराचे बोगस दस्तावेज सादर करून बँकेतून तीन कोटी दहा लाखांचे कर्ज घेतल्याचे तपासात उघडकीस आले आहे. श्वेता कबाडकर, दर्शन चुडगर, करण दलीप ढाबलिया, विशाल परमार, बिना रुपारेलिया आणि उमेश मंडल अशी या सहा जणांची नावे आहेत. यातील तक्रारदारांचे मालकीचे दोन फ्लॅट आहेत. ते दोन्ही फ्लॅट त्यांच्यासह त्यांच्या पत्नीच्या संयुक्त नावावर आहेत. त्यांची पत्नी श्वेता हिचा मालाड येथे गारमेंटचा व्यवसाय होता. कोरोना काळात तिला व्यवसायात प्रचंड नुकसान झाले होते. त्यातच तिने व्यवसासाठी काही लोकांकडून पैसे कर्जाने घेतले होते. कर्जाच्या वसुलीसाठी तिला संबंधित व्यक्तीकडून त्रास दिला जात होता. पैसे दिले नाही, तर कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली जात होती.

# किलीमांजारो शिखरावर तिरंगा फडकवणाऱ्या सीमा यांचा सत्कार



**मुंबई :** २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी आफ्रिका खंडातील सर्वाधिक उंचीचे किलीमांजारो (१९,३४१ फूट) पर्वत सर करून, तेथे शिखरावर तिरंगा फडकावून संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्याची कामगिरी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील उद्यानविद्या सहाय्यक तथा गिर्यारोहक सीमा माने यांनी पार पाडली होती. त्यांच्या या गिर्यारोहण कामगिरीची 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या संघटनेने दखल घेत माने यांना प्रशस्तीपत्र आणि पदक देऊन नुकतेच सन्मानित केले. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल माने यांचा पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी सत्कार केला.

अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (उद्याने) किशोर गांधी, उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी यांच्यासह विविध मान्यवरांनी सीमा माने यांचे अभिनंदन केले आहे.

सीमा माने यांनी गत दोन वर्षांत अनेक मोहिमा फत्ते केल्या आहेत. किलीमांजारो (१९,३४१ फूट) शिखर सर करणाऱ्या त्या महानगरपालिकेच्या पहिल्या महिला कर्मचारी आहेत. मूळच्या सातारा येथील रहिवासी असलेल्या माने यांनी सर्वप्रथम मे २०२२ मध्ये काश्मिर येथील प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला. तेव्हापासून त्या गिर्यारोहणाचा छंद जोपासत आहेत. 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या संघटनेने आतापर्यंत मिल्खा सिंग, सनथ जयसूर्या, विराट कोहली, सानिया मिर्झा, मिथाली राज, पी. व्ही. सिंधू अशा विविध दिग्गजांचा गौरव केला आहे. आता या पुरस्कार्थींच्या यादीत पालिकेच्या उद्यानविद्या सहाय्यक सीमा माने यांचाही समावेश झाला आहे.

**१ मे रोजी पुतळा झाकून ठेवल्याने अभिवादन करता आले नाही; डबेवाल्यांनी व्यक्त केली खंत**

# डबेवाला कामगार पुतळा हटवण्याच्या हालचाली

**मुंबई :** हाजीअली येथे डबेवाला कामगाराचा पुतळा हटवण्याच्या हालचाली सुरू असल्याची भीती डबेवाला संघटनेने व्यक्त केली आहे. बुधवार १ मे रोजी कामगार दिनी पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी डबेवाले गेले असता, पुतळा झाकून ठेवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे डबेवाल्यांना अभिवादन करणे शक्य झाले नाही, अशी खंत डबेवाल्यांनी व्यक्त केली. दरम्यान, याप्रकरणी उपनगराचे पालक मंत्री मंगलप्रभात लोढा पुतळा हटवू नये, अशी मागणी करणारे पत्र पालिकेच्या डी वॉर्डाचे सहाय्यक आयुक्तांना दिले आहे.



### पुतळा म्हणजे मराठी डबेवाला कामगारांची अस्मिता

बुधवारी कामगार दिन असताना देखील हा पुतळा चारही बाजूने पत्रा मारून झाकून ठेवण्यात आला होता. हा पुतळा म्हणजे मराठी डबेवाला कामगारांची अस्मिता आहे. वेळप्रसंगी आंदोलनाचे हत्यार उपसू, पण पुतळा हटवू देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांनी हा पुतळा या जागेवरून हटवू देऊ नये. वाहतूक बेट एका कंपनीकडून दुसऱ्या कंपनीकडे देखभाल करण्यास दिल्यानंतर पुतळे काढण्याचा पालिकेचा कायदा न समजण्यासारखा आहे, असे तळेकर यांनी म्हटले आहे.

हाजीअली येथील वाहतूक बेटात तत्कालीन आयुक्त अजोय मेहता यांच्या हस्ते 'मुंबईचा डबेवाला कामगार' पुतळा बसवण्यात आला आहे. सध्या हा पुतळा येथून हटविण्याचे कारस्थान चालू झाले आहे. हे वाहतूक बेट दुसऱ्या कंपनीने देखभाल करण्यासाठी घेतले आहे. त्या कंपनीला हा पुतळा तेथे नको आहे. कंपनीला त्यांची जाहिरात तेथे करायची असल्याने पालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून हा पुतळा येथून काढण्याचा प्रयत्न असल्याचा दावा मुंबई डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केला आहे.